1995-96
5th

# दिवाळी पूजा

## प.पू.श्री मातीजी निर्मला देवी

## सारांश २९.१०.९५

पंचवीस वर्षापूर्वी मी जेव्हा नारगोल्ला आले त्यावेळी सहस्त्रार उघडण्याचे माझ्या मनात नव्हते माझा विचार होता की अजून थोडे थांबावे आणि मानवाची स्थिती कशी आहे ते पहावे. त्यावेळेस आत्मसाक्षात्कार म्हणजे काय हें समजण्याइतकी त्याची स्थिती नव्हती. जरी पुष्कळ साधुसंतांनी आत्म-साक्षात्काराबद्दल सांगितले होते तरीही; महाराष्ट्रात तर हे ज्ञान खूप्च पसरले होते. कारण मध्यममार्ग सांगणाऱ्या नाथपंथीयांनी स्वतःच्या उद्धाराचा एक मार्ग सांगितला तो म्हणजे स्वतःला जाणणे. स्वतःला ओळखल्याशिवाय तुम्ही काहीही मिळवू शकत नाही हे मला माहीत होते पण त्यावेळी माणसाची स्थिती फार विचित्र असलेली माझ्या पाहाण्यात आले होते; खोट्या लोकांच्या ते मार्गे लागले होते. त्या लोकांना नुसते पैसे मिळवायचे होते. सत्य ओळखण्याइतकी मानवाची स्थिती नसते तेव्हा त्याच्याशी सत्याबद्दल बोलणे अवघड होते. लोक माझं कां ऐकणार? मला पुन्हा पुन्हा वाटायचे की माणूस अजून वरच्या स्थितीला यायला हवा. पण मला हेही दिसत होते की या कलियुगांत माणूस अगदी बेजार झाला आहे. गतजन्मींच्या पापकर्मांमुळे अडचणीत आलेले खूप लोक होते. काही लोक मागल्या जन्मात केलेल्या कर्मांमुळे राक्षस होऊन जन्माला आले आणि ते इतरांना त्रास देण्यांत ,उपद्रव देण्यात मग्न होते. याचं त्यांना काही चुकतोयं असंही वाटत नव्हते. मी दोन प्रकारचे लोक पाहिले. एक दुसऱ्यांना त्रास देणारे आणि दुसरे असमाधानी व त्रास भोगणारे. यापैकी कुणाकडे लक्ष द्यायचे याचा मी विचार करत होते. जे दुसऱ्यांना त्रास देत होते त्यांना आपण कोणी विशेष किंवा परिपूर्ण आहोत अशा वृत्तीचे होते; आपल्याकडून दुसऱ्यांना त्रास होत आहे एवढेही त्यांना समजत नव्हते. ज्यांना त्रास होत होता ते असहाय असल्यासारखे तो सहन करत होते. आपल्याला अधिकार गाजवून त्रास देणाऱ्या लोकांना विरोध करण्याचंही त्यांच्या मनात येत होते. मग मला वाटायचं की आपण बदलले पाहिजे हे माणसाला कधी उमजणार? हा बदल आपल्याला घडवून आणलाच पाहिजे. काही लोक जास्त त्रास देतील, कमी देतील, काही जास्त सोसतील, काही कमी. त्यावेळी समाजाची ही तऱ्हा होती. मग ते सर्व देवाच्या नांवाखाली, देशाच्या, सरकारच्या, आर्थिक सुधारणांच्या किंवा काटकसरीच्या इ. नांवाखाली. कोणी अगदी गरीब तर दुसरे अति-श्रीमंत अशा तऱ्हेने या देशात एक प्रकारची फसवणूक चालली होती. मला वाटायचे की जोपर्यंत माणसामधें परिवर्तन होत नाही, तो स्वतःला ओळखत नाही, त्याची खरी महानता व तेजस्विता त्याला प्राप्त होत नाही तोपर्यंत तो असाच वागणार. हे लहानपणापासून माझ्या मनांत होते आणि मला वाटले की माणूस खऱ्या अर्थानें समजणें जरूरीचे आहे. प्रथम-प्रथम मी माणसांचा बराच अभ्यास केला. मी तटस्थ राहून साक्षीभावानें मानवी जन्म समजण्याचा प्रयत्न करीत असे; त्याचे प्रश्न काय आहेत, तो कुठे चुकतो, चुकीचे विचार का करतो इ. विचार केल्यावर मी अशा निर्णयाला आले की हे सर्व माणसाचा अहंकार वा प्रति-अहंकार (कण्डिशनिंग) त्याला बाधतो. त्यामुळे तो संतुलनात असूं शकत नाही. जो पर्यंत तो संतुलनात येत नाही तोपर्यंत कुण्डलिनी वर कधी येणार ? हा सुद्धा एक कठिण प्रश्न आहे.

मी नारगोलला आले तेव्हां, काही विशिष्ट योगामुळे,

इथें एका राक्षसाने मुक्काम ठोकला होता. त्याने मला पाठवण्याविषयी माझ्या पतीकडे विनंती केली. मला तो मुळीच आवडला नव्हता पण फक्त पतीच्या आर्जवामुळे मी इथे आले आणि त्याच बंगल्यात राहिले. मी एका झाडाखाली बसून त्या राक्षसाचे खेळ व त्याचा कॅम्प पाहात होते. मला आश्चर्य वाटले की हा राक्षस प्रत्येकाला बोलवून संमोहित करत होता. काही किंचाळत होते, काही कुत्र्यासारखे, काही सिंहासारखे ओरडत होते. मग माझ्या लक्षात आले की तो सर्वांना पशू-योनीमध्ये नेत होता. त्यांची सुप्तचेतना तो प्रभावित करत होता. मला काळजी वाटू लागली. त्याआधी मी बरेच खोटे लोक पाहिले होते. मी इकडे-तिकडे फिरून ते लोक काय करतात ते पाहू लागले. त्यांच्याबद्दल आपल्याला माहिती असावी म्हणून. मी बघितले ते लोक खूप घाबरलेले होते. त्यांच्या शस्त्रधारी सैनिक होते. ते जर ईश्वरी कार्य करीत होते तर या सर्वांची काय जरूर? ते पैसा पण खूप खर्च करतात. लोकांना खोटेनाटे सांगून कोट्यावधी रुपये उधळतात. कलियुगाचे हेच महात्म्य आहे की असे अनाचारी, दुष्ट लोक समृद्ध होतात. म्हणूनच या सर्वांवर उपाय म्हणजे माणसाची जाणीव जागृत व प्रकाशित व्हायला हवी. त्याला सुज्ञता मिळावी म्हणजे काय चुकत आहे हे त्याला जाणीवपूर्वक समजेल.

मी पाहिले की माझ्या भोवतीच्या समाजामधें लोक मिनिटा-मिनिटाला दारू पिणे. पैशाच्या मागे लागणें अशा हानिकारक गोष्टींमधे गुंग आहेत. ते जेव्हा बोलतात ते नैसर्गिक नसायचे; जणूं नाटकांतल्यासारखे कृत्रिम वागायचे. माणसाला हे काय झाले आहे असे मला वाटायचे; तो असा गुलामासारखा का मख्ख झाला आहे. चुकीच्या गोष्टी का करत आहे असं वाटायचे. पण हे मी कुणाला सांगणार ? मी अगदीं एकटी होते. त्यावेळी मी जेव्हा इथें आले तेव्हा याला काय करायचे हाच माझ्यापुढे मोठा प्रश्न होता. तिकडे तो राक्षस लोकांना संमोहित करत असल्याचे मी पहात होते. मग माझ्या लक्षात आले की आतां जर मी सहस्त्रार उघडले नाही तर देवाच्या शोधासाठी धडपडणारे प्रामाणिक साधक कुठे जाऊन पडतील तो परमेश्वरच जाणे.

दुसऱ्या रात्री मी समुद्रकिनाऱ्यावर रात्रभर बसून राहिले. मी एकटीच होते आणि प्रसन्नचित्त होते. मग मी ध्यानांत गेले. आणि स्वतःमधेंच चित्त एकाग्र केले आणि मला वाटले की आता सहस्त्रार उघडावे. ज्या क्षणी ब्रह्मरंध्र उघडण्याची मला इच्छा झाली त्या क्षणींच स्वतःमधेच मला कुण्डलिनी दिसली. एकाद्या दुर्बिणीसारखी खट् असा आवाज होऊन प्रत्येक चक्रातून ती वर येऊ लागली. तिचा रंग तऱ्हे-तऱ्हेचा होता. जसं लोखंड भट्टीमध्ये तापवल्यानंतर त्याच्यामधून वेगवेगळ्या रंगाच्या ज्वाळा निघाल्यासारखे. मग कुण्डलिनी वर आली आणि ब्रह्मरंध्राला छेद करून बाहेर आली. आता मला माझे कार्य सुरू करता येईल हे मला समजले. कारण आता सर्व प्रश्न संपले आणि काळजीपासून मी मुक्त झाले. आता काय होणार असं मला वाटले. कदाचित् लोक विरोध करतील, हरकत घेतील किंवा माझ्याकडे पाहून हंसतील ? ह्याच्या पलीकडे फार तर मला ठार मारतील! तेव्हा आता त्याबद्दल काही काळजी करण्याचे कारण नव्हते. मला हे करायचेच आहे कारण त्याच कामासाठीं मी पृथ्वीवर मानव म्हणून जन्म घेतला आहे; मला सामूहिक चेतना जागृत करायची आहे. मला लक्षात आले होते कीं जोपर्यंन्त लोकांना आत्मसाक्षात्कार होत नाही तोपर्यंत ते स्वतःला जाणणार नाहीत आणि त्याशिवाय हे कार्य शक्य नाही. जगात त्यासाठी दुसरे काहीही करू शकलात तरी त्याचा उपयोग होणार नाही.

मी जागृती दिली ती व्यक्ति एक म्हातारी महिला होती. तिचा माझ्यावर खूप विश्वास होता. मी तिला जागृति मिळावी म्हणून देवाचे आभार मानले. खरं तर या कलियुगामधें लोकांना जागृति देणे हे सोपे नाही. तिला जागृति मिळाल्यावर मला समजले की दुसऱ्या पुष्कळ लोकांनाही असा साक्षात्कार मिळणे शक्य आहे. एकाद्याला व्हायब्रेशन्स देऊन जागृति देणे अगदी सोपें आहे. एकाद्याला आजारातुन बरें करणें पण सोपे असते. एकाद्याला जर कसला त्रास असला, कसले दुखणें वा कसली बाधा असली तर त्या व्यक्तीला ठीक करण्यासाठी काय करायला हवे ? एकाला एका प्रकारचा त्रास, दुसऱ्याला दुसऱ्या प्रकारचा तर तिसऱ्याला आणखीनच वेगळ्या प्रकारचा त्रास. जर आपल्याला सामूहिकतेमधें हे काम करायचे असेल तर एकाच वेळी सर्वांना हा साक्षात्काराचा अनुभव यायला पाहिजे.

हे सामूहिक चेतनेचे आणि जागृतीचे कार्य अशा तऱ्हेनें यशस्वी करण्यासाठी मला खूप ध्यान व चिंतन करावे लागले. माझी कुंडलिनी मला सगळीकडे वळवावी लागली. माझ्या कुण्डलिनीची कृपा दुसऱ्यांवर केन्द्रित करावी लागली आणि मी हे काय करत आहे हे कुणालाच माहित नव्हते. माझ्यापाशी

काय-काय शक्ति आहे , मी कोण आहे , हे कुणालाच , माझ्या कुटुंबातील पण कोणाला माहित नव्हते . मी कुणाला ते सांगितले पण नाही कारण मानवी बुद्धीला त्याचे आकलन होणे अवघड होते . प्रत्येकजण स्वतःच्या अहंकारात अडकलेला होता . मग हे ; कुणाला सांगणार ? कबीराने म्हटलेंच आहे "सर्व जग आंधळे असतांना त्यांना मी कसे सांगणार ? " जग आंधळे नव्हे तर अज्ञानी आहे . मग हे सूक्ष्म ज्ञान मी लोकांनी कसे देणार ? पण त्या म्हाताऱ्या बाईची कुण्डलिनी जागृत झाल्यावर तिच्यामधे एक सुक्ष्मशक्ति आल्याचे मला दिसले आणि त्या शक्तिव्दारे ती मला समजू लागली . त्यानं तर आणखी बारा जणांना जागृति मिळाली . या साक्षात्कारानंतर त्यांचे डोळे चमकू लागले व ते सर्व काही पाहू लागले याचं मला आश्चर्य वाटले . त्यांच्यामधे असा एक अनुभव घटित झाला की त्यातून ते समजू लागले . या पहिल्या बारा जणांच्या सर्व चक्रावर मी काम केले कारण हा पाया मजबूत बनायला हवा होता . मला हे करतांना खूप त्रास झाला कारण एकदां कुण्डलिनीजे जागरण झाल्यावर ती योग्य तऱ्हेने वर येण्यासाठी ध्यान आणि चिंतन करणे जरूरीचे आहे . त्याशिवाय ती कार्यान्वित होत नाही .

हे बारा लोक वेगवेगळ्या प्रवृत्तीचे होते आणि त्यांना एकत्र बसून आत्मप्रकाशात आणणे हे काम सुई-दोरा घेऊन त्यांत एक-एक फूल घालून हार बनवण्यासारखे आहे. त्यांना सामूहिकपणे एकत्र कसे आणायचे. या बारा जणांच्या भिन्न प्रकृतिधर्मांना एकाच दोऱ्यामध्ये कसे एकत्र करायचे ? पण त्यांना साक्षात्कार मिळाल्यावर हा एकजिनसीपणा त्यांच्यात, हळू-हळू निर्माण झाल्याचे मला दिसले. पण सामान्य माणसांच्या समूहाला हे सांगणे सोपे नव्हते. मग त्यांनी कोवासजी जहांगीर हॉलमध्ये एक कार्यक्रम जमवून आणला. त्यावेळी मी प्रत्येकाला या पृथ्वीवर राक्षस कसे जन्माला आले आहेत व ते काय करणार आहेत हे सांगितले. मग सर्वजण घाबरून गेले. ते म्हणू लागले, "माताजी , जर असे म्हणू लागल्या तर कोणीतरी त्यांना ठार मारेल". प्रत्येकजण म्हणाला , " हे सगळे उघडपणे सांगू नका , उगीच नको ते प्रश्न येतील. मी म्हणाले , " आजपर्यंत मला मारुन टाकणारा कोणी जन्माला आला नाही , उगीच काळजी करु नका".

मी त्यांना माझ्या कुण्डलिनीवर ध्यान करा म्हणजे तावडतोब निर्विचारता होईल असे सांगितले. निर्विचार अवस्थेत आल्यावरच ते माझ्या साक्षात् स्वरुपाशी एकरुप होणार. हळुहळु ही निर्विचारता वाढली आणि एका नव्या सामूहिकतेचा प्रकाश पडू लागला. कोवासजी जहांगीर हॉलमध्ये माझ्या लक्षात आले की भारतीय लोकांना त्यांच्या पूर्वजन्मीच्या पुण्यकर्मांमुळेच भारतात जन्म मिळाला आहे. भारतात हे कार्य करायला मुळीच त्रास पडला नाही , ते लोक पटकन् जागृत व्हायचे. सुरवातीला थोडासा त्रास झाला पण या पाश्चात्य लोकांना जागृति देता देता माझे हात मोडून जायचे. एखाद्याची कुण्डलिनी वर आणणे हे डोंगर उचलण्यासारखे असते , कारण ती परत परत खाली यायची. आणखी सामूहिकतेतून हे काम करणे जास्तच अवघड व्हायचे , ते विचित्र व मूर्खासारखे प्रश्न विचारत असत , त्यांची उत्तरे दिल्यावर या बाईला इतके कसं ठाऊक ह्याचे त्यांना आश्चर्य वाटायचे. सारखी माझीच परिक्षा ते घ्यायचे , कारण त्यांना खूप अहंकार आहे. लंडनमध्ये पहिल्या वेळी सात सहजयोगी झाले , ते सातीजण मादक औषधे पिणारे हिप्पी होते , पण नंतर सहजयोगी झाले. सहजयोगांत आल्यावर त्यांची व्यसने सुटली म्हणून मला ते आधार मानू लागले. अश्या व्यसनी लोकांना सरळ करणे सोपे नव्हते .

एका परीने हे चांगलेच झाले कारण हे काम करतांना मला जे कष्ट पडले त्यातून मला हे समजून आले की माणूस कितीही वाईट असला तरी त्याला जर शुद्ध इच्छा असेल तर हे शुद्ध ज्ञान मिळून पटकन जागृति मिळू शकते .

अंतःकरणापासून आत्मसाक्षात्कार मिळण्याची इच्छा ठेवा असे मी सगळ्यांना सांगत असे . तरच त्यांना जागृति मिळण्याची शक्यता असते . रशिया , उक्रेन , रूमानिया वगैरे वेगवेगळ्या देशांमध्ये मला निरनिराळे अनुभव आले . या देशांचे आपल्या देशाबरोबर पूर्वी कधीतरी संबंध असले पाहिजेत . मच्छिंद्रनाथ , गोरखनाथ वगैरे नाथपंथी तिकडे गेले असावेत ; कारण मला तिथे गेल्यावर समजले की , या लोकांना शंभरावर वर्षांपासून कुण्डलिनीची माहिती आहे . मग मला ह्या लोकांना इतकी लवकर जागृति कशी मिळू शकते हे समजून आले .

नाथपंथीयांनी महाराष्ट्रातही खूप काम केले , मीसुद्धा करत आहे पण दुर्दैवाची गोष्ट ही की उत्तर भारतात मी जितके यश मिळवूं शकले तितके महाराष्ट्रात मला मिळाले नाही . ह्या महाराष्ट्रीय लोकांना नाथपंथी लोक आणि त्यांचे कार्य चांगले माहीत आहे . साधुसंतांनी इथे खूपच काम केले आहे तरी असं का मला समजत नाही . उत्तर भारतासारखा या महाराष्ट्रात सहजयोग लवकर प्रस्थापित झाला नाही . याला काय कारण असावे ? मला वाटते की लोकांना एकाद्या

गोष्टीबद्दल आधींच सारे काही माहीत असले तर ते त्याबद्दल अनास्था दाखवतात. संस्कृतमधे एक म्हण अशी आहे की तुम्ही एकाद्या ठिकाणी किंवा व्यक्तिकडे तुम्ही वरवेवर जाता तेव्हां तुमच्याबद्दल अनादर निर्माण होतो. मग तुम्हाला पहिल्यासारखा मान मिळत नाही. प्रयागमधले लोक त्रिवेणीमधें स्नान करण्याऐवजी आपापल्या घरात स्नान करतात, तर जगातले ठिकठिकाणचे लोक तिथें येऊन पुजा करून स्नान करतात. महाराष्ट्रात सहजयोगांतील पुष्कळ लोक खूप कार्य करणारे आहेत पण त्यांचे समर्पण कमी पडते. समर्पण म्हणजे सहजयोगी म्हणून आपल्याला जे मिळाले आहे त्या सहज योग्याच्या स्थितीचा आपण कसा उपयोग करणार? ते काय फक्त आपल्या स्वतःच्या कल्याणासाठी आणि आपल्या अडचणी दूर होण्यासाठी, आपल्या कुटुंबाच्या भल्यासाठी आहे की सर्व जगासाठी?

सर्वप्रथम तुम्ही काय केले पाहिजे तर ध्यानामधे गहनता मिळवली पाहिजे. गहनतेमध्येच तुम्हाला वाटू लागेल की हा आनंद स्वतःसाठीच न ठेवता दुसऱ्यांनाही तो मिळावा ही इच्छा प्रबळ झाली की मगच सहजयोग वाढेल. त्यानंतरच माणसाला वाटेल की आयुष्यामधे हा आनंद व समाधान दुसऱ्यांना पण वाटावा; त्याच्यापेक्षा श्रेष्ठ दुसरे काही नाही. मग इतर कशाचंही भान रहात नाही. हे झाल्यावरच सहजयोग वाढतो व बळावतो; रात्रंदिवस त्याचाच ध्यास लागतो आणि त्याचा आनंद उपभोगतो.

आजकाल महाराष्ट्रामधे पैशाला फार महत्व आले आहे. ते सकाळी चार वाजता उठून ध्यान वगैरे करतात पण ते यांत्रिकपणे होते. खरं म्हणजे ते हृदयापासून व्हायला हवे आणि त्यात भक्ति हवी. या भक्तिभावनेचा पसार करा; महाराष्ट्रीयन लोकांनी हेच केले पाहिजे.

मी हे सर्व माझ्या हयातीत पाहू शकेन असं मला वाटले नव्हते. हे सारे कुण्डलिनीचे महात्म्य आणि परमचैतन्याचे कार्य झाले आहे. हे परमचैतन्य क्षणांत कसा चमत्कार करते याचे मलाच आश्चर्य वाटते. ही शक्ति माझ्याजवळ असली तरी हे परमचैतन्य माझी वेगवेगळी रूपे दाखवीत आहे. तऱ्हेतऱ्हेचे चमत्कार घडवीत आहे. जसे मेक्सिकोमधे, यु.नो.मधे नोकरी करणाऱ्या एका महिलेला जागृति मिळाली; तिचा मुलगा फार आजारी असल्याचे तिने मला पत्रातून कळविले; तिच्या घराण्यात मुलांना म्हातारपणाचे रोग/आजार व्हायचे. या मुलाला तोच आजार होता. तिने मला तीन पत्रे पाठवली आणि चौथ्या पत्रात तो स्वतःहूनच बरा झाल्याचे कळवले. हे परमचैतन्याचे कार्य आहे आणि त्या परमचैतन्याहून मोठा डॉक्टर कोणी नाही; त्याचे कार्य म्हणजे कमालीचे आश्चर्य असते. पुष्कळ लोकांना असे बरेच चमत्काराचे अनुभव आले आहेत कारण हे परमचैतन्य आता कृपाशिर्वादाने भरलेले आहे. सगळीकडे हे आशीर्वाद तुम्हाला मिळणार आहेत. ते तुम्हाला प्रेम, शांती देईल आणि तुमची सर्व प्रकारे काळजी घेईल. हे सगळीकडे होतेच पण आता त्याच्या हालचालींमधे खूप वेग आला आहे. नुकताच अमेरिकेमध्ये एका मोठ्या हॉलमधे मोठा प्रोग्राम झाला तेव्हा लोकांना बसायला जागा नव्हती; पण पाचं मिनिटांत सर्वांना जागृति मिळाली; ते सुद्धा लॉसएंजिलससारख्या ठिकाणी. मी जिथे जिथे गेले तिथे तिथे लोकांना पाच मिनिटांत जागृति मिळाली. सर्व काही आश्चर्यजनकच. परमचैतन्याचे कार्य इतके वाढले आहे आणि इतक्या वेगवेगळ्या प्रकारे चालले आहे की ते सामान्य माणसाला समजणार नाही. एकाने माझा फोटो घेतला आणि त्याला इच्छा झाली की देवीच्या रूपात तिच्या पायामधे चंद्र व डोक्यामधे सूर्य आहे असं सांगितल्याप्रमाणे हा फोटो यावा आणि खरोखरच तसाच फोटो आला. तुम्ही लोक जी इच्छा कराल ते होणार आहे. आणखी काय सांगायचे ? परमचैतन्याची ही शक्ति अगाध आहे आणि इतकी सक्षम आहे की त्याला तुमचे सारे प्रश्न, आजार, इ. माहीत असतात व प्रेमाने व हळुवारपणे ती सर्व ठीक करते. तुम्ही आदिशक्तीची पूजा करतां त्याचक्षणी या परमचैतन्याची (रूह) पुजा करता. ही शक्ति आतां इतकी कार्यरत आहे की लोकांनी आतां या जगामधे परिवर्तन घडवण्यास विलंब करू नये. जो पुढे येऊन हे कार्य करायला हातभार लावतील त्यांचा फायदा होणार आहे ही शक्ति किती काय काय करते ? तिच्यामुळेच तुम्हाला आत्मसाक्षात्कार झाला आहे. तिचा तुम्ही उपयोग करू लागलात की तुम्हाला अशक्य असं काही नाही. कुणी तुम्हाला त्रास देत असेल तर त्याला बंधन द्या . जे काही काम तुम्हाला करायचं असेल त्यालाही बंधन द्या. बंधनात असल्यावर तुम्ही काय करता? तुमच्याकडून जी शक्ति वहात असते ती तुम्ही बांधून ठेवता आणि मग तुमचे जे काम असेल, जे प्रश्न असतील त्यांना बंधन देता ही शक्ति आंता तुमच्याजवळ आहे आणि तुम्ही शक्तिशाली झाला आहात. या शक्तिचा वापर करून तुम्ही कोठपर्यंत जाऊन पोचूं शकाल मलाच माहीत नाही.

परमेश्वराचे तुम्हा सर्वांना अनंत आशीर्वाद.

# नवरात्री पूजा

## कबेला, इटली : १-१०-१९९५

### श्री माताजी निर्मलादेवी यांच्या भाषणाच्या सारांश

श्री दुर्गामातेने सत्याच्या शोधांत असलेल्या सर्व साधकांचे रक्षण केले आणि त्यांना त्रास देणाऱ्या, छळणाऱ्या आणि मारुन टाकणाऱ्या सर्व लोकांचा नाश केला. त्यांचे अवतरणच मुळी अशा सैतानी प्रवृत्तीपासून साधकांचे संरक्षण करण्यासाठी होते. म्हणूनच या आधुनिक काळात ते साधक उन्नतीला पोचले व त्यांना सत्य समजले किंवा ते त्या मार्गावर आले. या कठीण प्रसंगामधूनच त्यांना जीवनाचा शाश्वत अर्थ समजला. सुरवातीला त्यांना सत्य शोधण्याकरता खूप प्रयत्न करावे लागले; निरनिराळ्या दुर्धर व एकान्त ठिकाणी रहावे लागले. कारण हा मनःशान्ति मिळवण्याचा व त्यांतून सत्य शोधण्याचा त्यांचा प्रयत्न होता तसेच त्यांना त्याकरता बराच त्याग करावा लागला, संपत्तीचा त्रासच होतो म्हणून तिच्याकडे पाठ फिरवावी लागली, आणि मुलाबाळांची आपल्या साधनेत आडकाठी होते म्हणून त्यांच्यापासून दूर रहावं लागले. हे सर्व चालूच राहिलं. अजूनही असे बरेच लोक आहेत ज्यांना अशा तपश्चर्येमधून सत्य सापडण्याची आशा असते. बुद्धांनी, महावीरांनी हेच केले; त्यांचं जीवनच एक घोर तपस्या होती. या सर्व घोर तपश्चर्यांचे फळ म्हणूनच आज आपण अशा अवस्थेला आलो आहोत की, आहे त्या परिस्थितीमध्ये आत्मसाक्षात्कार मिळणं आपल्याला शक्य झाले आहे. एरवी या आधीच्या लोकांना हा साक्षात्कार मिळवण्यासाठी किती त्रास व कष्ट सोसावे लागले याचं नुसतं वर्णन वाचूनही तुम्ही थक्क व्हाल. ही तपश्चर्या करत असतानाही त्यांना त्रास देणारे, छळणारे आणि ठार करणारे पुष्कळ लोक होते. असं का झालं? कारण त्या लोकांना आपण काय करत आहोत ते कळत नव्हते; ते नुसते त्यांची चेष्टा करण्यात, हसण्यात आणि टिंगल करण्यात मग्न होते. हे सर्व लक्षात घेतल्यावरच आपल्या लक्षात येते की आपल्याला आत्मसाक्षात्कार किती सहज, काहीही त्रास न होता, घोर तपस्या न करता, उपास-तापास न करता, सहजासहजी मिळाला आहे.

तुम्ही लोकांनीच हे सारं पूर्वी केलं आहे आणि म्हणूनच तुम्ही इथे जमला आहांत, आत्मसाक्षात्कार मिळवणं हा तुमचा अधिकारच आहे. स्वतः काहीही न करता आपल्याला हे मिळालं आहे असं समजणं बरोबर नाही, कारण जन्मोजन्मी तुम्ही हेच शोधत होता. तुम्ही कुठलाही मार्ग पत्करला, कुठलाही धर्म मानला किंवा कुठेही श्रध्दा बाळगली तरी तुमचा त्रास चुकला नाही. पण त्या त्रासाचं फळ तुम्हाला आता मिळालं आहे आणि तुम्ही साक्षात्कारी संत झाला आहात पण माणसाची प्रवृत्तीच अशी आहे की, त्याला जे काही विनासायास मिळतं त्याला त्याची किंमत कळत नाही. म्हणून तुम्ही समजून घेतलं पाहिजे की हे जे तुम्हाला सहज मिळाल्यासारखं वाटतं ते तुम्ही कोणी कुचकामाचे लोक नाही तर तुम्ही फार मोठे लोक होता, संत होता, हिमालयात जाऊन तुम्ही उपाशीपोटी तपस केले, उपास-तापास केले आणि तुमच्यापैकी कित्येक जण देवाच्या नावाखाली मृत्युमुखी पडले म्हणून आज तुम्हाला जे काही मिळालं आहे, जो साक्षात्कार मिळाला आहे ते काही नुसत्या आईच्या कृपेमुळे मिळालं आहे एवढंच समजू नका. तुम्ही तुमच्या थोर

व्यक्तिमत्वामधूनच ते मिळवलं आहे. तसं नसतं तर मलाही तुम्हाला 'जागृत' करणं शक्य झाले नसते. देवदेवतांनी खूप काही कार्य केले आहे त्यांनीच तुम्हाला मानवी जीवनाच्या या स्थितीपर्यंत आणून ठेवले आहे. आता तर तुम्ही अगदी शेवटच्या पायरीपर्यंत आला आहात, तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळाला आहे आणि तुम्ही उच्च स्थितीला येऊन पोचले आहांत.

ही कुण्डलिनीशक्ति, जिच्यामधून तुम्ही सर्वव्यापी परमेश्वरी शक्तीबरोबर जोडले गेले आहांत ती आजपर्यंत धडपड करत होती. तुमची काळजी घेत होती, तुमचं रक्षण करत होती. कारण या कलीयुगातच तुम्ही तुमचं ध्येय मिळवावं यासाठी कलियुगामधेच हे घटित होणार, परमेश्वराच्या शोधांत डोंगरातून व दऱ्याखोऱ्यातून हिंडणाऱ्या लोकांना हे मिळणार हे आधीच ठरलं होते. फरक एवढाच की आता ते साधेसुधे, चार जणासारखे, मुलाबाळांसह संसारात राहणारे समाजातले सामान्य लोक असतील, कुणी साधु-संन्यासी नसतील तर मुलं वाळ असणारे संसारी लोक असतील आणि अशा सामान्य लोकांनाही आत्मसाक्षात्कार मिळणार हे पण ठरलं होतं. भृगुमुनींनी हेच भाकीत केले होते, हे सर्व आधीच सांगितले होते; मला वाटते की, सारी योजनाच तशी होती पण यामधे खरं श्रेय तुमचंच आहे कारण फक्त तुम्हा लोकांनीच सत्य जाणलं आहे. एरवी पुष्कळ खोटे, फसवे लोक आजुबाजूला आहे हे तुम्हाला माहीत आहेच. ते वेगवेगळ्या क्लृप्त्या योजून लोकांना आपल्या जाळ्यांमध्ये अडकवून ठेवतात; तरीही तुम्ही माझं स्वरुप ओळखले आहे, हे जपणे ही फार महान गोष्ट आहे आणि माझं मलाच आश्चर्य वाटते की हरवलेल्या बालकांना आई (Mother) सापडावी तसं तुम्ही माझ्याजवळ आला आहांत पण हे सर्व आपल्याला काहीसुद्धा कष्ट न घेता सहजासहजी मिळालं आहे असं कोणी समजू नये. कारण त्याचा परिणाम असा होईल की आपली पुढील प्रगति पूर्वी इतक्याच वेगाने व समर्पकतेने होण्यामध्ये अडथळे येतील. म्हणून तुम्हांला हे सारं सहज घडून आल्यासारखे वाटते ते खरं म्हणजे इतक सरळ-सोपं नाही. तेव्हा हे सर्व 'सहज' घडलेलं असले तरी ही वेळ फार महत्त्वाची आहे हे तुम्ही लक्षात घ्यायला हवे. आपल्याला सार जग सुधारायचे आहे आणि त्यासाठी तुम्हाला सिद्ध व्हायचं आहे आणि ते कसं करायचं हे पण तुमचं तुम्हालाच जमवायचे आहे.

रशियामध्ये मला एका प्राण्याचा (जीव) जो मान्यवर शास्त्रज्ञ होता, चांगला अनुभव आला. रशियामधील तो फार मोठा शास्त्रज्ञ आहे. त्याची आध्यात्मिक ज्ञानामधे पण चांगली जाण आहे. मला आईला भेटायची फार इच्छा आहे असं तो लोकांना सांगत असे. मी म्हणाले "ठीक आहे, तो भेटला तर मलाही आनंद वाटेल". तो माझ्याकडे आल्यावरोवर मला पाहून म्हणाला, "आई, तुम्ही या आधुनिक युगामध्ये परमेश्वरी अवतरण घेऊन आला आहात." एका शास्त्रज्ञाचे असे उद्गार ऐकून मला आश्चर्यच झाले. पण त्याची नजरच इतकी शुद्ध होती की त्यातून भक्ति आणि विनय ओसंडून जात होता. मग तो म्हणाला, " तुम्ही मदत करणार असाल तर आम्हाला एक फार मोठी गोष्ट करायची आहे." मी म्हणाले, "तुम्हाला असं काय करायचं आहे?" त्याच्याजवळ असं मोजमाप करण्याचे एक उपकरण होते." मी तुमच्या फोटोची शक्ती पण अजमावू शकत नाही." असही तो म्हणाला. मग त्याने मला एक आकडा सांगितला जो मला समजलाच नाही, सातशेचा अनेक कोट्यावधी वर्ग असा काहीतरी तो विचित्र आकडा होता. मी म्हणाले, "हा कसला आकडा आहे? मला काहीच समजेनास झालं आहे." तर तो म्हणाला "हा तुमचा फोटा इतका शक्तीशाली आहे." मग मी म्हणाले "ह्या फोटोमध्ये जर इतकी शक्ती आहे तर तू तो घेऊन जा. मी काय करायचे आहे तू सांग" मग त्याने मला चार पाच वेळा नमस्कार करून आदराने तो फोटो घेतला. त्या फोटोचं तू काय करणार आहेस असं विचारल्यावर तो म्हणाला "मी हा फोटो उपग्रहावरून प्रक्षेपित करणार आहे. त्याच्या मागे विद्युतचुंबकीय शक्ति सोडणार आहे म्हणजे त्या फोटोची शक्ति आणि त्याच्या चैतन्य लहरी सर्व वस्तूंमधे शिरकाव करतील. कारण विद्यूत-चुंबकीय लहरी कुठेही शिरतात. अशा तऱ्हेने उपग्रहावर जाऊन मी हे प्रक्षेपण करु शकलो तर जगातले सर्व प्रश्न सुटतील. जिथे जिथे या फोटाचे प्रक्षेपण होईल त्या त्या ठिकाणचे प्रश्न सुटतील." नुसत्या फोटोमुळे एवढं होऊ शकेल हे ऐकून मी स्तिमित झाले. म्हणजे या माणसाचे विचार कुठपर्यंत पोचले आहेत

बघा. हे सर्व अगदी सोपं आहे असंही तो म्हणाला हे कसं शक्य आहे असं मी म्हटल्यावर त्याने एक स्प्रिंग घेतली आणि ती पाण्यामधे ठेवली; त्या पाण्याला मी चैतन्य लहरी दिल्याबरोबर ती स्प्रिंग उड्या मारायला लागली. त्याने त्याच्याजवळच्या उपकरणामधून बघायला सांगितले तर ते सारं प्रचंड वेगात हलत असल्याचं समजले. "तुमची केवढी शक्ति या पाण्यांत उतरली आहे हे बघा." असं तो म्हणाला. ही शक्ति जड वस्तुंवरही कार्य करु शकेल हे मला माहितच नव्हते. ह्या शक्तिला काहीही अशक्य नाही असं तो म्हणाला. या शक्तिनूनच सर्व काही निर्माण झालं आहे आणि ही शक्ति सर्व वस्तुमात्रांवर कार्य करणार आहे हे त्याने सांगितल्याचे ऐकून मला फार आश्चर्य वाटले. तो पुढे म्हणाला ",मी तुमच्याच दर्शनाची वाट पहात होतो आणि आता मी हे काम सुरु करणार आहे. मला खूप काही काम करायचं आहे आणि मातेच्या जीवनकालातच ते होणार आहे, आम्ही काय करत आहोत ते तिला पाहू दे." हा शास्त्रज्ञ कुठून पैदा झाला हे मला आश्चर्यच वाटलं. केवढा मोठा शास्त्रज्ञ !

रशियामधील उच्चपदस्थ लोकांमध्ये अशा खूप काही कल्पना आहेत. पण त्यांच्याजवळची अध्यात्मिकतेची व नैतिक मूल्यांची जाण ही मुख्य आहे. असाच आणखी एक तरुण भेटला. फार तर ३०-३२ वयाचा, पण फार चमकदार मी काय करुं असं त्याला विचारल्यावर तो म्हणाला "कांही नाहीं. तुम्ही आजपर्यंत आमच्यासाठी खूप कष्ट घेतलेत, आता आम्ही तुमच्यासाठी कार्य करणार." काय करायचं ठरवलं आहे असं विचारल्यावर पुढे म्हणाला "मी इथल्या सरकारमधील अध्यात्मिक कामाचा अधिकारी आहे." आश्चर्याची गोष्ट आहे ना? कुठल्याही सरकारकडे असा विभाग नाही. तो म्हणाला" आमचा लहान मुलांपासून कॉलेजमधे शिकणाऱ्या मुलांशी संबंध येतो. माताजी, कुठल्या वयापासून मुलांमध्ये ही आवड निर्माण होऊ शकते?" याबद्दल काही तर्कशुद्ध नियम नसतात असं मी म्हणाले, पण अगदी लहान मुलं अबोधित असल्यामुळे त्यांच्यामधून हे कार्यान्वित होते असं म्हटल्यावर तो म्हणाला "मुलांच्या डोक्यात हे कसं रुजवायचं?" मी म्हटलं की त्यांची कुण्डलिनी जागृत करून ठेवली तर मोठेपणी त्याच चित्त फार सूक्ष्म होते आणि तुम्हीच आश्चर्यचकित होता. पुढे तो म्हणाला "मी आता सगळ्या मुलांना एकत्र आणून सहजयोग हाच खरा मार्ग आहे हे त्यांना सांगणार."

नंतर आणखी एक माणूस आला. तो संसद सभासद होता आणि फार तडफदार होता. प्रथम तो येल्त्सिनचा खास माणूस होता पण नंतर त्याचा नाद त्याने सोडला होता, कारण त्याच्याजवळ नीतिमत्ता नव्हती. तो म्हणाला, "ज्यांच्याजवळ नीतिमत्ता नाही त्या लोकांशी आम्हाला संबंध नकोत. आता आम्ही "My Mother Land" या पार्टीच्या नावावर निवडणूक लढवणार आहोत. आमच्याकडे लोकशाही. कम्युनिझम् वगैरे ठाम असे प्रकार नाही. आमच्या देशाला काय हिताचं आहे ते आम्ही करणार आहोत." अगदी व्यवहारी दृष्टि ठेवणारे असे प्रामाणिक लोक. तो म्हणाला पण की" मानवी जीवनाचा आधार म्हणजे नीतिमत्ता अगर नीतिमूल्यांची चाड नसेल तर सर्व काही बेकार."

मी युक्रेनमध्ये जेव्हा गेले होते तेव्हा तिथे अगदी पुरातन काळी वापरतात तशा रंगाची काही पेंटिंग्ज़ पाहिली ते लोक म्हणाले "माताजी, या ख्रिस्तपूर्व काळापासून आमच्याजवळ जपलेल्या कलाकृति आहेत. त्यांनी श्री आदिमातेची चित्रे असलेल एक मासिक दाखविल. त्याला ते 'आदिती' ह्या नावाने म्हणत, संस्कृतमध्ये पण आदिती हाच शब्द आहे खरं वाटत नाही ना? ते म्हणाले की ख्रिस्ती आक्रमणाच्या पूर्वीची ती संस्कृति आहे. त्यात मूलाधार चक्राची निरनिराळ्या प्रकारची व आज्ञाचक्राची चित्रे पण होती. त्यांच्या जवळ त्या विषयावरची पुस्तके असल्याचे पण त्यांनी सांगितले, पण चर्चच्या दबावामुळे त्याला काही किंमत नव्हती. ते आर्यवंशीय असल्याचे व भारताबरोबर त्यांचे संबंध होते. त्यांच्या भेटीगाठी होत असत असंही ते म्हणाले, मच्छिंद्रनाथ भारताच्या उत्तरेकडे गेले होते. कदाचित् ते युक्रेनमध्ये आले असतील. युक्रेन हा शब्द कुरुपासून आला आणि त्यांची संस्कृति पूर्वीपासून ३००० वर्षापासून आहे यावर एकदम विश्वासच बसत नाही. एवढंच नव्हे तर भारत देश अध्यात्मिकतेचा उगमस्त्रोत आहे असंही ते म्हणाले. इतक्या पुरातन काळीही कुण्डलिनीच अस्तित्व युक्रेनमध्ये ज्ञात होते ह्याची कल्पनासुद्धा तुम्हाला येणार नाही. केवढी सुंदर संस्कृति !

मी युक्रेनमध्ये प्रथम गेले तेव्हा तिथल्या प्रोग्रामला चॅर्नोबिलहून (जिथे अलिकडेच अणुकेन्द्रात स्फोट झाला होता) काही लोक आले होते. त्या सर्वांपैकी कोणाची बोटे कापलेली, काहींची बोटे चिकटलेली, कुणाच्या सर्व अंगावर फोड आलेले, कुणाचं नाक वाकडं झालेले असे होते, पण या वेळी सर्व हॉल तुडुंब भरला होता. जाण्यायेण्याची जागा पण भरली होती आणि बाहेरही लोक उभे होते. चेर्नोबिलच्या अपघातांत जखमी झालेले आम्ही लोक आहोत असं ते म्हणाले. पण आता पहा, आम्ही पूर्ण बरं झालो आहोत प्रोग्रामला आलो आणि बरे झालो असं म्हणाले.

मला नेहमी आश्चर्य वाटायचे की हे रशिया आणि युक्रेनमधले लोक अध्यात्माबद्दल इतके उत्सुक कसे झाले? मग माझ्या लक्षात आले की ही प्रवृत्ति त्यांच्यामधे फार पुरातन काळापासून आलेली आहे; फार पूर्वीपासून ते याच्यामागे होते. पण कुण्डलिनीचं जागरण त्यावेळी इतक्या प्रमाणात होत नव्हते. खेड्यापाड्यातूनही अशी मूलाधार चक्राची, आज्ञाचक्राची चित्रे ते रंगवीत. अगदी स्वच्छ तऱ्हेने. आज्ञाचक्रामध्ये चीनमधले Yin आणि Yang होते. हे सारं समजल्यावर मला वाटले की जगामध्ये असे आणखी लोक असले पाहिजेत. आता कोलंबियामध्ये पण हीच कुण्डलिनी आणि कुंभ वगैरे सर्व सापडले आहे; मला वाटले हे पण ख्रिस्तांपूर्वी ३-४ हजार वर्षापासूनचे आहे. म्हणून आतां आपल्या लक्षात येईल की हे ज्ञान या देशांमधील लोकांजवळ आहे आणि लोकांच्या मनावर अजून त्याचा प्रभाव आहे. कारण ते आत्मचिंतनशील होते.

एखाद्या देशामधील मुळांमध्येच जेव्हा हे अध्यात्म्याचं पाणी मिळते तेव्हांच तेथील लोकांमध्ये त्या विषयाबद्दल संवेदनशीलता निर्माण होते. एखादा परमेश्वरी चमत्कार प्रकट व्हावा तसे मग तिथल्या लोकांना कुण्डलिनीबद्दल सर्व माहित होते. आदिशक्तिबद्दल, अध्यात्याबद्दल ते जाणकार असतात आणि आत्मसाक्षात्कारानंतर व्यक्तिमध्ये कसं परिवर्तन होते वगैरे सर्व गोष्टी दृष्टोपत्तीस येतात. त्यांच्या दृष्टिने मी सत्य आहे आणि कदाचित् म्हणूनच ते माझ्यासमोर नतमस्तक होतात. कधी कधी मलाही समजत नाही की या लोकांनी इतकी अध्यात्मिक उन्नति व शांति कशी मिळवली? ते शाळा चालवतात; मी म्हटले "ही शाळा इथे आहे आणि तुमच्या देशाचं काय होणार हे मलाच समजत नाही; तुम्हाला काळजी वाटत नाही का?" ते म्हणाले "आम्ही कशाला काळजी करणार? आता आम्ही परमेश्वरी साम्राज्यात आलो आहोत, आम्ही रशियात नाही मग काळजी कसली? आम्हाला खूप चांगले लोक तिथे भेटतात, अध्यात्मामध्ये प्रगत झालेले लोक भेटतात." त्यांनी सर्व अगुरुंच्या त्याग केला आहे आणि माझ्याबद्दल खूप आदर आहे. माझी सेवा करतात. माझ्याकरता त्यांनीच ही कॉन्फरन्स केली.

मी हे तुम्हाला मुद्दाम सांगत आहे. तुम्हाला आत्मसाक्षात्कार झाला आहे. आत्म्याला तुम्ही जाणलं आहे, परमेश्वराच्या साम्राज्यात तुम्ही सारे आले आहांत यात कसली शंका नाही. पण आता तुम्ही हे समजून घेतलं पाहिजे की तुम्हाला ही जी शक्ति मिळाली आहे ती तुमच्याकरता काय करु शकते. ती तुमचं कसं परिवर्तन करते हे ओळखयचं सर्वात मोठी गोष्ट म्हणजे ती तुम्हाला निर्विचारतेच्या जाणीव स्थितीला आणते. तुम्ही वर्तमानांत येता. वर्तमानात राहणं ही फार अवघड गोष्ट. एकदा तुम्ही निर्विचारता जाणली की मग तुम्ही कुठेही असला तरी विचार तुम्हाला भंडावून सोडत नाही. याचा अर्थ काय? सोप्या भाषेत सांगायच म्हणजे की, त्यानंतर तुम्ही कसली प्रतिक्रिया करत नाही तुमच्या मनात प्रतिक्रिया उमटत नाही. आजच्या सहजयोग्यांचा हाच मूळ प्रश्न आहे आणि त्याच्यावर तुम्हाला मात करायची आहे. तुम्ही प्रतिक्रिया करणं सोडा.

उदा. म्हणजे मी काही लोक असे बघते की कुठलही कारण नसताना ते हसायला लागतात. कुणालाही बघितलं तरी लगेच प्रतिक्रिया सुरु, प्रत्येक गोष्टीबद्दल आपलंच मत सांगायला सुरुवात. प्रत्येकजण स्वतःला विद्वान समजू लागतात आणि काय सगळ्यात चांगल, काय वाईट, काय बरोबर वगैरे काही ना काही बडबड सुरु. मनाला मग तीच सवय. सारखे उलटसुलट विचार. मनाच्या या प्रतिक्रिया थांबल्या की निर्विचारतेमध्ये तुम्ही जागरुक होता. प्रत्येक गोष्टीकडे फक्त पहा, साक्षी म्हणून पहा. उलट विचार येऊं देऊं नका. तुम्ही मनाचीच शक्ति वापरलीत तर निर्विचारता संपते. पुष्कळ लोकांमध्ये हाच दोष आहे. आणि याचं

कारण मला वाटतं, तुम्ही जास्त हुषार, चांगले शिकलेले आहात. तुम्हा स्वतःला काय वाटते मला माहित नाही पण हे सारखे प्रतिक्रियात्मक विचार करणारं मन अध्यात्मिक प्रगतीला घातक आहे. त्यामुळे तुमची वाढ कठीण होईल.

आता या अव्याहत प्रतिक्रिया चालल्यामुळे तुमच्या भावना बदलत राहतात. काहीतरी मनात राहून तुम्ही दुसऱ्याकडे बघता. मुलं-वाळं असली तर त्यांच्यात गुंतून जाता. हे गुंतून जाणं एक कृत्रिम प्रकार आहे. ते सत्य नाही पण मन उलटसुलट विचार करते आणि तुम्हाला पकडून राहते. आता पुष्कळशा या सवयी सुटल्या आहेत. उदा. म्हणजे धर्म, जात, वंश वगैरे तुम्ही संपवले. पण तरीही प्रतिक्रियात्मक मन आहेच. आज सहजयोग्यांच्या प्रगतीला हाच अडथळा आहे. आजच्या सहजयोग्यांच्या या अडचणीबद्दल मी खूप विचार करत असते. एकदा तुम्ही प्रतिक्रिया करणं थांबवले की तावडतोब तुम्ही शांत अवस्थेमधे स्थिरावता. तुम्ही काहीही बघा, पण नुसतं पहात रहा. मनरूपी जलाशयावर कुठलीही लहर येणार नाही. मगच तुम्ही निर्माणक्षम, उत्साही आणि खूप कनवाळू होता. मग तुम्हाला कसली भीति नाही. चांगल्या गोष्टींपासून, सद्‌गुणांपासून जो आनंद मिळणार असतो तो मनातले विचार थांबल्यावरच अनुभवास येतो. म्हणजेच तुम्ही सर्व काही ईश्वरी इच्छेवर सोपवता. तुमचा त्यांत काही अधिकार नाही. कशाबद्दल आपल्याला काही ठरवायचं आहे याचीदेखील जाणीव ठेऊ नका. विचार थांबवता येणे ही मोठी शक्ति आहे; त्या दृष्टिने कुणाकडे बघणंसुद्धा बंद करा. तुमची ती सवय अजून गेली नाही असं मला दिसत आहे.

आता मी तुम्हाला आत्मपरिक्षणाबद्दल सांगितले आहे. त्यामध्यें विचार जरी असला तरी त्यातून तुम्हाला तुमची स्थिति समजते. पण त्यामुळे मानसिक दृष्ट्या तुम्ही कधी कधी कमकुवत वा निराश होता आणि स्वतःलाच दोषी ठरवू लागता. अशाने तुम्हाला स्वतःच व्यक्तिमत्त्व समजणार नाही तुमच्या चैतन्यलहरी कमी झाल्याचं जाणवेल. शक्ति निघून गेल्यासारखं वाटेल. कारण यावेळी तुमचा स्वतःवर ताबा नसतो. असं जर होत असेल तर हे आत्मनिरिक्षण थांबवा. कारण या मानसिक प्रक्रियांमुळे आणखी प्रश्न निर्माण होत असल्याचे मला दिसते.

निर्विचार स्थितीमध्ये तुम्ही जेव्हा जागरुक असता तेव्हा आत्मपरिक्षण आपोआप होत राहते. तुम्हाला ते आपोआप समजते. मग त्याच्याबद्दल विचार उरत नाही. हे नुसतं घटित होते. सर्व काही तुम्हाला चित्रासारखे स्पष्ट होते आणि तुम्ही स्वतःशी शांत होता. तुमची चलबिचल संपते. तुम्हाला कशाचा राग येत नाही, तुम्ही भांडत नाही, वादविवाद करण्याच्या फंदात पडत नाही; जणू काही जागृतीच्या सागरामध्ये उडी मारल्यासारखे वाटू लागते. मग आपल्याला काही उपाय (उत्तर) सापडायचा आहे याची काळजी करावी लागत नाही. मग जेव्हा विचार सुरु होतात तेव्हा ही शक्ति कार्यरत असल्याचे तुम्हाला समजते.

तुमच्याकडून अविष्कार व्हायला पाहिजे पण तुम्ही विचारही करायचा नाही हा थोडासा विरोधाभास वाटतो. आपण प्रतिक्रिया करतो तेव्हाच आपण शोषणही करतो. एखाद्या गोष्टीचा विचार करतो तेव्हा ती गोष्ट आपल्या अंतरंगात शिरते. बहुतेक वेळा आपलं चित्त दुसऱ्याच्या दोषाकडे लागते. हा माणूस चांगला आहे तो वाईट आहे, हिचे केस नीट नसतात, तिची साडी बरोबर नाही, इ. फालतू गोष्टी यावेळेस काय होते तर वाईट गोष्टीचा पण आपल्यात शिरकाव होतो. तुम्ही दुसऱ्यांच्या चांगल्या गोष्टीचं कौतुक करतां तेव्हा वाईट गोष्टी तुमच्यात शिरणार नाहीत आणि हा एक प्रकारचा फायदाच म्हणायचा. तरीही जागरुक निर्विचार अवस्थेमध्ये असं कौतुक केले तर ते खोलवर जाते. हा भाव मी त्या शास्त्रज्ञाच्या डोळ्यांमध्ये पाहिला; जणू ते माझ्याशी पूर्णपणे एकरुप झाला होता आणि त्याचे डोळे शांततेचा सागर होते. तो फक्त माझ्याकडे पहात होता, बराच वेळ, आणि जागा झाल्यासारखा म्हणाला "तुमच्या फोटोमधून आम्ही हे करु शकतो" म्हणजे तुमच्यामध्ये अशी गहनता विचार थांबल्यावरच येऊ शकते. आता सामान्य माणसाचं काय चालेते तर हे कार्पेट चांगलं नाही ते चांगलं नाही, इथे वास येतोय .... म्हणजे सारखं हे, ते वगैरे! सारखे दुसऱ्याबद्दल परीक्षण, दुसऱ्या गोष्टींवर परीक्षण याला काय महत्त्व? जर तुम्ही स्वर्गातील बागेमध्ये बसला आहात तर मग कुठं बसलात, काय केले याला कांही

अर्थ नसतो.

प्रतिक्रिया केल्यामुळे मनात विचारांच्या लहरी वाहू लागतात. मी अगोदरच चित्रावरून समजावल्याप्रमाणे उजव्या बाजूवर आलेली शक्ति डावीकडे वळून डाव्या बाजूवर पडते आणि परत जाते. ही डावीकडे आणि उजवीकडे सिंपथेटिक नाड्यांमध्ये थोड्या फार प्रमाणात शोषली जाते. उरलेल्या शक्तिमधून प्रतिक्रिया सुरु होते. प्रतिक्रिया ही अशी सुरु होते. आता ही सर्व शक्ति जर सिंपथेटिक संस्थेमध्ये खेचून घेऊ शकलो तर आपली शक्ति पहिल्यापेक्षा हजारपटींनी वाढेल आपण थकणार नाही वा कधी दुःखी होणार नाही. आपण पुष्कळशा फालतू गोष्टी सहन करू शकू; त्याला नावे ठेवणार नाही; त्याला वाईट म्हणणार नाही; म्हणजेच त्यांचा आपल्यावर काही परिणाम होणार नाही हा गुण आपल्यामध्ये वृद्धिंगत व्हायला हवा.

देवी जे करु शकते ते तुम्ही करू शकत नाही; ते तिचं काम आहे आणि तुम्ही नाही तर तिलाच करायचं आहे. तुम्हाला फक्त शांत रहायचं आहे म्हणजे ज्या गोष्टींमुळे ही शांतता वाढेल त्याच तुमच्यामध्ये शिरकाव करतील आणि परिणामी तुमची गहनता वाढेल. बाकी सर्व काही देवी बघून घेईल. या जगात पसरलेली सर्व घाण, राग, ईर्षा वगैरे सर्व वाईट गोष्टी ती खेचून घेईल. तुम्ही फक्त जे शुद्ध असेल त्याचा आनंद उपभोगायचा.

मनाच्या पलीकडे गेल्याशिवाय आनंद मिळणार नाही. मनापासून कधीच आनंद मिळत नाही तुम्ही जेव्हा अगदी शांत होता, वृत्तीच्या लाटा जेव्हा नाहींशा होतात तेव्हाच आनंद असतो. अशा शांत जलाशयावर उमटणाऱ्या आनंदाच्या लहरी पूर्णपणे परावर्तित होतात; हा आनंदच फक्त परिवर्तित होतो, लाटा तशाच जिरून जातात. लाटा जर राहिल्या तर ते स्वरूप पूर्णपणे बदलले असते आणि ते सत्याच्या प्रतिबिंबासारखे झाले असते म्हणून मन हे सत्याच्या अलिकडेच. दूर राहिले पाहिजे. सत्य म्हणजे फक्त शांतता आणि आनंद; त्यामध्ये कसलं दुःख नाही, कष्ट नाहीं, भूक नाहीं कांहीं नाहीं फक्त आनंदच असतो पण हा आनंद मिळवण्यासाठी आणि पूर्णपणे उपभोगण्यासाठी माणसाने अपरावर्तित स्थितीला आलं पाहिजे. आता तुम्ही स्वतःकडे बघा, आपण किती प्रतिक्रिया करतो याचं तुम्हालाच आश्चर्य वाटेल. तुमच्यापाशी सर्व कांहीं आहे, हे परमचैतन्य काय काय करत आहे हे मलासुद्धा माहीत नाही, तुमचं काम फक्त एकच की तुम्ही काम करणं थांबवा. तुम्ही आश्चर्यचकित व्हाल आणि या स्थितिमधेच तुम्ही गहनतेत उतराल. अशी प्रगति झाली की तुम्ही त्या शास्त्रज्ञासारखे व्हाल.

आता हाच विरोधाभास बघितल्यावर तुम्हाला कळेल की गहनता आली की ती तुमच्यामधून परावर्तित होईल. मनातून नव्हे मी जेव्हा असं म्हणते तेव्हा लोकांना वाटते की ही मानसिक क्रिया आहे. पण नाही, कारण तुमची गहनता बाहेर जाणवली पाहिजे म्हणजेच तुमच्यामधील सत्याचा चैतन्याचा प्रकाश बाहेर पडला पाहिजे. त्यासाठी तुम्हाला विचार करायला नको, योजना करायला नको, कारण ते आपोआप कार्यान्वित होईल. त्यावेळी तुम्ही फक्त एक उपकरण बनता हे समजायला अगदी सोपं आहे. आता मी या माईकवर बोलत आहे; ठीक आहे, आता हे उपकरण जर पूर्णपणे ठीक असेल, त्याच्यांत काही दोष नसतील तर व्यवस्थित शांतपणे काम करेल. पण त्याच्यामध्ये आपल्या बुद्धीमध्ये जसे विचार कल्पना येतात तसे येऊ लागले तर मी जे काय बोलत आहे ते जसेच्या तसे प्रक्षेपित होणार नाही. त्याच्याप्रमाणे आपल्या मनात जेव्हा अनेक विचारांचा व कल्पनांचा गोंधळ चाललेला असतो आणि काय बोलायचे, सांगायचे किंवा प्रक्षेपित करायचे याचा गोंधळ असतो तेव्हा मनाच्या या चलविचल अवस्थेमध्ये आपण स्वतःला परावर्तित करू शकत नाही, कारण मन स्वच्छ शांत रहात नाही. आता तुम्हाला हा विरोधाभास वाटणार नाही. तुम्ही जेव्हा पूर्ण शांत असता तेव्हाच स्वतःला बाहेर अविष्कृत करू शकता. आपल्याला हे शिकलं पाहिजे.

नवरात्र ही जगाच्या पश्चिम भागामध्ये २१ ता नंतर म्हणजे सप्टेंबरमध्ये सूर्य मकरवृत्ताकडे यायला लागतो तेव्हा सुरु होते हे लक्षात असू दे तशा २ नवरात्री होतात; एक आता सुरु होते व दुसरी सूर्याच्या दुसऱ्या संक्रमणानंतर सध्याच्या प्रसंगी मेरीमातेचा जन्मदिवस मानला जातो आणि लोक तिचा वाढदिवस साजरा करतात. हा जन्म दिवस सूर्य मधोमध आला तेव्हा संतुलनात आहे. मोठ्या अवतारांच्या

जीवनाबद्दल बरंच काही सांगितले गेले नसल्यामुळे लोकांनी जसं समजलं तसं सांगत राहिले कारण त्यांचे चमत्कार त्यांनी पाहिले होते. त्या लोकांना हे संक्रमण म्हणजे काय आणि ते साजरे का करायचे हे माहीत नव्हते. इराणमध्ये मला सांगण्यात आलं की या दिवसापासून त्याचे नववर्ष सुरु होते; म्हणजे त्यांच्याकडे हा बारावा महिना असतो आणि त्याला बरेच अर्थ असतात. बारा महिनेच का असतात? देवीचा जन्म बारा वाजता का झाला? तुम्हाला हे सर्व माहित होईल पण जेव्हा तुम्ही मनांतुन समजण्याचा प्रकार थांबवाल तेव्हा.

या स्थितिमधेच तुम्ही सर्वव्यापी ईश्वरशक्तिशी खऱ्या अर्थाने जोडले जाता. एरवी तुम्ही तिथे नसता, त्या स्थितीमध्ये सामावून राहण्यासाठी तुम्ही स्वतःबरोबर अगदी पूर्णपणे शांत निःशब्द व्हायला हवे. देवी नेहमी शांत असते; युद्ध चालले असले तरी ती शांत असते, कारण तिचा आत्मविश्वास अढळ असतो. तिला तिची शक्ती माहीत असते, महिषासुर तिला काही करणार नाही हे पण तिला ठाऊक असते. एवढंच नव्हे तर तो तिला स्पर्शही करू शकणार नाही हे पण तिला माहीत असते. त्याची ताकद तिने ओळखलेली असते आणि स्वतःची शक्ति माहीत असल्यामुळे तिला कसलाही त्रास होत नसतो ती विचलीत होत नाही कारण तिच्या रुपाने ही शान्त स्थितीच साकार झालेली असते ज्यावेळी ती फार शक्तिशाली बनते. आपल्या शक्तिचाही विचार करण्याची तिला जरूर नसते. तिला ती शक्ति मागावी पण लागत नसते; योग्य वेळी ती आपणहून कार्यान्वित होते.

या स्थितीमध्ये इतक्या गोष्टी तुमच्या नकळत घडत असतात की तुम्ही आश्चर्यचकित होता; तुम्ही काहीही न करता. आणि यालाच आपण योगायोग म्हणतो पण खरं तर तसा तो योगायोग नसतो ही एक अशी स्थिति असते जेव्हा आपण निर्विचार पण जागृत असतो आणि परमचैतन्याबरोबर जोडलेले असतो अगदी परिपूर्णपणे तसे राहतो आणि तेच आपल्यासाठी सर्व कार्य करू लागते.

आता या देवीने वर्षानुवर्षे किती कार्य केलेले आहे ते आता सहजयोगामध्ये आल्यावर तुम्हाला माहीत झाले आहे. तुम्ही आता साक्षात्कारी आत्मा झाला आहात आणि तुम्ही समजून घेतलं पाहिजे, स्वतःबद्दल पूर्ण आत्मविश्वास बाळगून, स्वतःला पूर्णपणे ओळखून समजून घेतले पाहिजे, की तुम्हाला कसली भीति नाही, मनाला त्रास देणारे कसले विचार नाहीत आणि या स्थितीमध्ये तुम्ही एक फार शक्तिशाली व्यक्ति आहात. या नवरात्राच्या दिवशी देवीने तुमच्यासाठी काय काम केले आहे ते तुम्ही ओळखाल अशी मला आशा आहे तसेच तिने फार कष्ट करून या राक्षस व सैतानांबरोबर युद्ध केले आहे हे जाणाल. कधी कधी मला वाटते की हे राक्षस अजूनही आपल्यामध्ये आहेत, बाहेर नव्हे; आणि हे व्हायचं कारण म्हणजे आपण त्यावर जास्तच विचार करत असतो. आपण कधी पाश्चात्य व्यक्तिबरोबर बोललो तर त्यांच्या डोक्यात प्रसारमाध्यमाचे भूत कसं बसले आहे याचं तुम्हाला आश्चर्य वाटेल. त्यांना प्रत्येकाबद्दल माहिती असते. ह्याने काय केले, हे काय, ते काय इ. सर्व; पण आपण स्वतः कसे सुधारणार हे कार्यान्वित कसं करणार याची त्याला काळजी नसते. या जागरुक निर्विचार स्थितीमध्ये तुम्ही साऱ्या विश्वभर संचार करु शकता; जिथे जिथे प्रश्न आहेत तिथे ही शक्ति कार्य करु शकते.

आपण आपली महानता ओळखून ही शक्ति आपल्यामध्ये आहे हे लक्षात घेतले पाहिजे. या भावनेचा आदर करून देवीच्या कृपेने तुम्हाला आपल्या सर्वांना तिने इतकं दिले आहे त्या सर्वांचे श्रेय तिला दिलं पाहिजे. तुम्हाला इतक्या सहज साक्षात्कार मिळाला व आतां तुम्हाला कुणाची पर्वा नाही असं तिला दिसता कामा नये. तसेच पुढे प्रगति करण्याची तत्परताही तिला दिसायला हवी. तसं न वागल्याने तिला दुःख होईल असं नाही पण तिचे कार्य, तिने जे काही केले आहे ते आपण पहायला हवे, समजून घ्यायला हवे आणि आपली भावना अशी हवी की काहीही करून साक्षात्कार मिळाल्यावर आपण तिच्या शक्तिचे परिपूर्ण वाहक बनणार आहोत. ते जर व्हायचं असेल तर तुमच्या स्वतःच्या कल्पना, विचार बाजूला ठेवले पाहिजेत. पूर्ण सक्षम उपकरण, जसं मी मगाशी सांगितल्याप्रमाणे हा माईक निर्दोष नसेल तर काम होणार नाही. तुम्हा सर्वांचे आभार.

ईश्वराचे तुम्हाला अनंत आशीर्वाद.

# अंतर्देशीय शास्त्र परिषद

## नीतिमत्ता स्वास्थ व जग

## प. पू. श्री. माताजी

या सृष्टीमध्ये अध्यात्म्याच्या एकाच वृक्षावर निरनिराळे धर्म फुलांसारखे उमलले, पण लोकांनी ती सुंदर फुले तोडली आणि आता त्या वाळलेल्या फुलांवरुन भांडत सुटले आहेत. हे माझे. हे माझे. दुसऱ्या महायुध्दानंतर ईश्वराच्या नावाखाली एक नवीन प्रकारचे युध्द सुरु झाले आहे. ईश्वर एकच आहे असं जर तुम्ही मानता तर मग भांडण - मारामारी कां ? तर लोकांमध्ये ईश्वर ही एक मानसिक कल्पना आहे म्हणून. त्यांच्या ह्दयांत तो सत्य म्हणून नव्हे. कुठलाही धर्म द्वेष करायला सांगत नाही पण आपल्याला अगदी उलट चित्र दिसत आहे.

सुरवातीला सर्व धर्म त्यांच्या शुध्द स्वरुपात स्थापित झाले आणि जगामध्ये सर्वत्र प्रेम, शांति व एकता आणण्याचा त्यांचा उद्देश होता. नंतर काही लोक धर्मावर प्रभुत्व गाजवायला लागले. प्रथम-प्रथम हे लोक चांगले असले तरी कालांतराने त्यांच्यामधे फूट पडू लागली. त्यांनी इतर काही केले असले तरी त्यांनी नीतिमत्तेची भावना निर्माण केली, त्याबद्दलच ते सांगत राहिले. तसेच करुणा व प्रेम याबद्दलही त्यांनी सांगीतले. त्याचप्रमाणे या भावना बाळगणाऱ्या बऱ्याच संस्था उदयाला आल्या पण हे सर्व बरवरचे होते. स्वतःला ख्रिश्चन, मुस्लिम किंवा हिंदु म्हणवणारा कुणीही माणूस बघा. तो खरा ख्रिश्चन असतो कां ? ख्रिस्त म्हणाले होते "तुझ्या नजरेत पाप नसले पाहिजे". अशी पापी नजर नसणारा ख्रिश्चन माणूस तुम्ही पाहिला आहे कां? किंवा पूर्वी अशी नजर नसणारा ? मोहम्मदसा म्हणाले होते की जोपर्यंत तुम्ही स्वतःला खऱ्या अर्थाने जाणत नाही तुम्ही चुका करणार. 'स्व' म्हणजे आत्मा. किती जणांनी तो प्रयत्न केला आहे ? सगळे मुसलमान पहा, त्यांच्या मध्ये आध्यात्मिक प्रवृत्ति दिसते कां ? ते फक्त युध्द करत आहेत. मला वाईट वाटते की या युध्दामधे हजारो लोक मारले गेले. पण त्यांना युध्द करायला उत्तेजनच मिळत आहे. त्यांनी जे काही चांगले केले ते शेवटी वाया जात आहे, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे जे कोणी त्यांचा धर्म मानत नाहीत ते त्यांचे शत्रु. मुसलमानांबद्दल जर तुम्हाला काही माहिती हवी असेल तर ज्यू लोकांना विचारा, ज्यू लोकांची माहिती ख्रिश्चन लोकांना विचारा आणि ख्रिश्चनांबद्दल माहिती हवी असेल तर आपले अमेरिकेला जा आणि ते काय करत आहेत ते पहा. अनैसर्गिकपणा चालेल असे ख्रिस्त म्हणाले होते कां ? वेश्याव्यवसायाबद्दल ते कधी बोलले होते कां ? पाश्चात्य देशांत पावित्र्याचा आदर नसतो. मग तुम्ही ख्रिश्चन कसे? मुसलमानांचीही तीच तऱ्हा. ते इस्लामबद्दल बोलतात, जो एक महान धर्म होता, ज्याच्यात नीतिमत्तेला फार महत्व होते, मोहम्मदसा. ख्रिस्ताबद्दल आणि आईच्या पावित्र्याबद्दल बोलले होते. पण

आज मुस्लिम बघितले तर ते ख्रिश्चनांपेक्षा वाईट. एकदां मी रियाधहून दिल्लीला येत होते आणि प्रवासांत झोपून गेले. जागे झाल्यावर पाहते तर सगळे पुरुष व महिला प्रवासी अरब-पेहराव केलेले. उठून पाहते तो सगळ्यांचे पोशाख अद्यावत, फॅशनेबल, महिलांनी तर अगदी अश्लील कपडे घातलेले, लाजिरवणे, सगळेजण दारू पीत होते, सिगरेट ओढत होते. म्हणून मी त्या हवाई-सुंदरीला विचारले "आपण मधेच दुसऱ्या ठिकाणी उतरलो होतो का ?" ती म्हणाली "नाही". मी मग म्हणाले, "हे लोक कुठून आले ?" ती म्हणाली " ते पहिलेच आपल्याबरोबरचे आहेत". मी म्हटले, "ते इतके कसे बदलले ? ती म्हणाली, "त्यांना तुम्ही लंडनमधे जाऊन पहा, ते स्कॉट लोकांपेक्षा जास्त पितात". ख्रिश्चन धर्म मागे पडला, इस्लाम मागे पडला. जबरदस्ती करुन नीतीमत्ता येत नाही. मला काही इंग्रज पुरुष भेटले, मी त्यांना विचारले, "तुम्ही सारखे बायकांकडे का बघता?" ते म्हणाले "त्यांत आम्हाला आनंद मिळतो" मी म्हटले, "ख्रिस्तांचं काय ?" ते म्हणाले, "आम्ही चर्चमधे सुध्दा हेच करतो. नाही तर आम्ही कुणाकडे पहायचं ?" मी म्हटले, "तुम्ही करुं शकता. तुम्ही ख्रिश्चन नाही, मुस्लिम नाही, ज्यू पण नाही. तुम्ही सर्व अगदी मूर्ख लोक आहात". आम्ही काय करावं असं त्यांनी विचारल्यावर मी म्हणाले, " तुम्ही सत्य शोधायला तयार आहात कां ? का तुम्हाला तुमच्या पूर्वापार चालत आलेल्या दृढ कल्पनांप्रमाणेच आयुष्य जगायचे आहे ? का तुम्ही ख्रिश्चन, ज्यू, मुस्लिम वगैरे आहांत म्हणून तुम्ही तारलेले लोक आहात? मी अगदी स्पष्टपणे सांगते की तुम्ही सर्व जण नरकांत जाणार आहात." ते म्हणाले "कां ?" तर मी म्हणाले, "सत्य हे आहे की तुम्ही तुमचा धर्म पाळत नाही. तुमच्यासाठी ते फक्त एक लेबल आहे.

प्रथम अब्राहम आले, मग मोझेस, मग ख्रिस्त. ती एक पायरी- पायरीने पुढे जाणारी गतिमान व्यवस्था होती. मुसलमानांनासुध्दा 'शरियत' मिळाली नव्हती. कुराणमधे शरियतचा उल्लेख नाही. बायबलमधे लिहिले आहे की मोझेसने ती ज्यूंना दिली. पण ज्यू म्हणाले की आम्हाला ते नको, ते फार अवघड आहे. ख्रिश्चन पण तसंच म्हणाले. मुसलमानांनी मात्र त्याचा स्वीकार केला. मोझेसने ज्यू लोकांना मुद्दाम दिली होती कारण त्यावेळेस ज्यू लोकांची खूप अवनति झाली होती. पण त्याचा कुणाला फायदा होतो कां ? जर ते निर्गुण निराकार ईश्वराला मानतात तर मग कुठल्याही देशासाठी अगर जमिनीसाठी त्यांना युध्द का करायला हवं ? ईश्वर सगळीकडे आहे. जे लोक आपण प्रथम ख्रिश्चन आहोत, प्रथम मुसलमान आहोत इ. म्हणतात तेच युध्द करतात. कारण त्यांच मन राजकारणाकडे असते, अध्यात्माची त्यांना ओढ नसते. तुम्ही अध्यात्मवादी असायला हवं, नाही तर आम्ही ईश्वर वगैरे मानत नाही असं ठामपणे म्हणणारे असावं.

आता पाश्चात्य संस्कृति व मूलतत्त्ववादी यांच्यामधील हा संघर्ष आहे. मूलभूततत्त्ववादि म्हणतात की संस्कृति कडक नियमांचे पालन करणारी हवी. ते जबरदस्तीने ती लादण्याचा प्रयत्न करतात. अल्जेरियामध्ये पाश्चात्य प्रकारचे कपडे घातले म्हणून हजारो लोक मारले गेले. पॅरिसमधे आतां ते बॉम्बस्फोट करत आहेत. अत्याचाराचे अनेक प्रकार ते घडवतात. मोहम्मदसा. नी करुणा - रहीमबद्दल सांगितले. ते त्यांच्या बायकांना वाईट वागणूक देतात. आठ-दहा मुलांना जन्म देऊ न शकणाऱ्या बायकांना तलाक म्हणून सोडून देतात. भारतात अशा हजारो महिला व मुले आहेत, ते देशातील सर्वांत गरीब लोक आहेत. मोहम्मदसा. नी सांगितले की तुम्ही चार-चार बायका करा पण स्त्रिांनी वेश्या बनण्याच्या ते विरोधी होते. तो काळच तसा होता. आता मुस्लिम महिला वेश्या बनूं लागल्या. त्यांचे पोट कसं भरणार ? ईस्लामच्या नांवाखाली ते उपाशी राहणार ? स्वतःच्या मुलांना ठार मारण्याची

पाळी येणार? ख्रिश्चन, मुस्लिम, ज्यू या धर्मामुळे काय चांगलं झालं आहे ?

धर्माचे पालनपोषण करणाऱ्यांनी त्यांच्या परीने खूप प्रयत्न केले, पण त्यांनी वास्तवाला सामोरे व्हायला हवे. ख्रिस्त, मोहम्मद, बुध्द यांना जे अपेक्षित होते ते ते मिळवू शकले नाहीत. उलट त्यांनी डोळसपणा न ठेवल्यामुळे या महान धर्मांचे व त्यांच्या महान संस्थापकांचे नांव खराब केले.

तुमच्या दूरदर्शनवर परदेशी वस्तूंच्या जाहिराती मी पाहिल्या. तुम्हांला वेड लागले आहे कां ? पाश्चात्य देशांत, अमेरिकेल न विकल्या जाणाऱ्या खराब, बेकार वस्तूंवर तुम्ही वेड्यासारखा पैसा ओतत आहात. तुमच्यातले शिकलेले लोक अमेरिकेत जाऊन भांडी धुण्याचं काम करतात. देशप्रेम, त्याग वगैरेचे नांव नाही. माझ्या देशामधे परदेशी बनावटीचा टायसुध्दा मिळत नाही. हे सांगायला मला अभिमान वाटतो. हे गांधीजींमुळे झाले, त्यांनी परदेशी कोणतीही वस्तू वापरायला मनाई केली. हातमागावर बनलेले कापड व हातांनी विणलेले कपडे घालायला त्यांनी सांगितले. माझ्या आई-वडिलांनी देशाकरतां खूप त्याग केला, ते फार देशप्रेमी होते, मी पण आहे आणि तुम्ही सर्वांनी देशप्रेमी असावं असं मला वाटते. सहजयोगांतूनच हे शक्य आहे. नुसते 'मी ख्रिश्चन आहे, इस्लाम आहेम्हणून काय होणार ?' 'मी रशियन आहे' असं तुम्ही प्रथम म्हणा. कुठल्याही मार्गाने तुमच्या इच्छेप्रमाणे जा पण तुम्हाला खरं काय पाहिजे ते आधी ओळखा.

"स्विस बँक" हा आणखी एक चोरटा व बेकायदेशीर प्रकार आहे. त्याच्याबद्दल कोणीही काही बोलत नाही. त्यांनी त्याचा स्वीकार केला आहे. माझ्या देशांतील तीन-चतुर्थांश संपत्ति तिथे अडकली आहे, रशियन टोळ्या (Mafia) तिथे किती आहेत मला माहित नाही. ते सर्व बेकायदेशीर आहे. तुम्ही तुमच्या कायदे-प्रणालीची शक्ति पणाला लावून तपास करायला हवा. हा सर्व पैसा गरिबांसाठी, आजाऱ्यांसाठी व महारोग्यांसाठी होता. त्यांनी हा सर्व पैसा स्विस बँकमधे अडकवून ठेवला आहे. माझा देश फार सामर्थ्यशाली होता, पण तीनशे वर्षे हे इंग्रज लोक तिथे राहिले. व्हिसा वगैरे काही नाही आणि त्यांनी आमचा देश लुटला, आता उलट परिस्थिती अशी आहे की एका भारतीय नागरिकाला इंग्लंडमधे जायचं असेल तर त्याची काटेकोर चौकशी होते. त्यांनी आमचे सोने-चांदी, हिरे वगैरे सर्व मौल्यवान वस्तू नेल्या, जणू महामार्गावरील लूटमार आणि हेच लोक स्वतःला ख्रिश्चन म्हणवतात. शिवाय भारतातून निघून जाण्याच्या आधी त्यांनी हिंदु - मुसलमान हा प्रश्न निर्माण केला. तसंच बौध्द, जैन, **ख्रिश्चन** यांच्याबद्दल केले. तेव्हा मुसलमान म्हणाले आम्हांला आमचा स्वतंत्र देश हवा. मुसलमानांना आपल्या जमिनीशी फार जवळीक असते. म्हणून पाकिस्तान व बांगला देश वेगळे झाले. बांगला देश हा जगातला सर्वात गरीब देश, आता ते गुपचूप प्रकारे भारतात परतण्यासाठी घुसखोरी करत आहेत. पण पाकिस्तानची परिस्थिती याहून खराब आहे. भारत सोडून जे लोक पाकिस्तानमधे स्वखुशीने गेले त्यांना वाटलं होते की आपल्या देशात आल्यावर खूप पैसा व मान मिळवता येईल, पण झालं उलटे, त्यांना गुलामांसारखी वागणूक मिळाली. भारतीय लोक हुषार आणि चलाख. तेथील सर्वांत महत्वाच्या म्हणजे कराचीमधे ते एकत्र जमले. त्यांचा जो म्होरक्या होता तो म्हणाला की इथले प्रधानमंत्री हिटलरसारखे आहेत व ती रोज १४-१६ जणांची हत्या घडवून आणते म्हणजे त्यांची संख्या कमी होईल. म्हणून आतां मुस्लिमच मुस्लिमांविरुध्द लढत आहेत. सद्दम हुसेन या बड्या श्रीमंत मुसलमानांवरोबर लढाई करत आहे. खुर्द लोक तुर्कांबरोबर लढत आहेत. इस्लामधे मोहम्मदसा. ना अश्याने देवपण मिळणार आहे कां ? त्यांनी स्वतःचीच ओळख करुन घेतली नाही, मग त्यांना ईश्वर कसा समजणार? ?

सहजयोग हा एकच पर्याय आहे ज्यामधून तुम्हाला आत्मसाक्षात्कार मिळू शकेल आणि स्वतःचे - आत्म्याचे - ज्ञान मिळेल. आमच्यामधे सगळ्या देशांचे, सगळ्या धर्मांचे, सगळ्या जातीचें लोक आहेत आणि त्या सगळ्यांनी मला सांगितले आहे की सहजयोगंतूनच आम्हाला शांति मिळाली आहे. तुमच्या अंतःकरणातच जर शांतता नसेल तर दुसऱ्यांना तुम्ही शांतता कशी देऊ शकाल ? ज्या लोकांना शांततेचे पुरस्कार मिळतात ते स्वतः शीघ्रकोपी असतात. त्यांच्या चेहऱ्यावर कधी हास्य दिसत नाही. त्यांना नेहमी तणाव असतो. ते कसे कुणाला शांतता देणार ? म्हणून सर्व प्रथम आपण स्वतः आतून शांत झालं पाहिजे. मी गेली २५ वर्षे हेच काम करत आहे. तुम्हाला शांतता तर मिळतेच पण त्याबरोबरच तुम्हाला परमेश्वराच्या राज्यांत प्रवेश मिळतो. मागच्या वेळेस मी रशियात आले होते तेव्हां इथे सत्ता बळकावण्याचा प्रकार चालला होता पण इथले सहजयोगी मात्र पूर्णपणे शांत दिसले. मी विचारलं "हे जे काय चाललं आहे त्यामुळे तुम्हाला काळजी वाटत नाही कां ?" ते म्हणाले "माताजी, आम्ही परमेश्वराच्या साम्राज्यात बसलो आहोत, आम्हाला कसली काळजी ?". सरकार जाते, नवीन येते, पण आपण अक्षय जीवनांत आहोत. त्यांच्या चेहऱ्यावर तुम्हांला हे भाव दिसतील. यात खोटेपणा, ढोंग काही नाही.

सहजयोगमधून तुम्हाला अंतिम पूर्ण ज्ञान होते, त्यामधे सापेक्षपणा मुळीच नसतो. मी ख्रिश्चन आहे, मुस्लिम आहे या भावनेमुळे ज्ञानामधे सापेक्षपणा येतो. मी मुस्लिम आहे म्हणून मी ख्रिश्चन माणसापेक्षा उच्च आहे, यामागे एक ठाम भावना असते कारण जन्माने तुम्ही मुस्लिम किंवा ख्रिश्चन असता. हिटलर हे याचे सर्वात उत्तम उदाहरण आहे. तो म्हणायचा की माझी जन्मजात सर्वोच्च आहे. त्यांनी मुलांनासुध्दा विषारी वायूच्या कोठडीत मारलं आणि असूरी आनंद मिळवला. त्यांची जात कशी काय उच्च ? आणि कशावरुन ती उच्च ? साधुसंताजवळ प्रेम आणि करुणा असते. आपल्याजवळ मात्र आपल्याच कल्पना डोक्यात घर करुन बसलेल्या असतात आणि आपल्याजवळ, या जखडून ठेवणाऱ्या कल्पनांचा त्याग करण्याची मोकळीक आणि धैर्य नसते. याशिवाय माणसाचा स्खलनशील स्वभावही आपल्याला सुटत नाही. सगळेजण मानतात आणि मी पण म्हणते की सर्वव्यापी शक्तिचा संचार सगळीकडे आहे. ती मिळवण्याचा प्रयत्न आपण कां करु नये ? नुसतं मी ख्रिश्चन आहे, मुसलमान आहे एवढच का म्हणत बसतो ? जर ख्रिस्तांनी, मोझेसने, मोहम्मदसा. ने पण त्या शक्तिबद्दलच सांगून ठेवले आहे तर ती आपण का मिळवू नये ? त्यांत काय नुकसान आहे ? जर काही मिळवण्यासारखं आहे तर कां घ्यायचं नाही ? आणि मुख्य म्हणजे त्याला पैसा लागत नाही. पैसे अजिबात द्यावे लागत नाहीत. खरं तर मला तुमच्याकडून काहीच नको. मी स्वतः समाधानी आहे. मला स्वतःला सहजयोगची पण जरुर नाही. माझ्यामधील प्रेम आणि करुणेची भावनाच मला जगभर हिंडून हे सर्व करायला प्रवृत्त करते. कारण लोकांनी डोळ्यावर झापड घेतले आहे, त्यांना दिसत नाही. मला आता चर्च, देऊळ, युध्द, स्मशानभूमि कशाचीच जरुरी नाही. पण आत्मा हा हृदयातंच वास करून आहे, हे सर्व कुंडलिनीच्या यंत्रणेतच आहे. परमेश्वराने स्थापित केलेली ही व्यवस्था आहे. उन्नतीचे शेवटचं ते शिखर आहे. कुंडलिनी ही तुमची आई आहे, तीच तुम्हाला हे देणार आहे. ती तुमची स्वतःची शक्ति आहे, स्वतःची आई आहे. परमेश्वराच्या सर्वव्यापी शक्तिशी योग साधण्याचा तुम्हाला अधिकार आहे. आता समजा परमेश्वराने तुम्हाला हे उपकरण (माइक) दिले आहे., पण जर तुम्ही त्याला मुख्य प्रवाहाशी जोडले नाही तर त्याचा उपयोग होईल कां ? तुमची ओळख काय ? तुम्ही मानवी जन्माला कां आला आहांत ?

आता शास्त्राकडे वळू यां. शास्त्रालासुध्दा सीमा आहेत. ते जी काही चर्चा करतात ते शास्त्र आहे. पण मानवी

प्राणी पृथ्वीवर का आला हे त्यांना सांगता येईल कां ? त्याची उन्नति कां झाली हे त्यांना सांगता येईल कां ? मानजन्माचा उद्देश त्यांना माहित आहे कां ? अशा अनेक प्रश्नांची त्यांच्याजवळ उत्तरे नाहीत. आता डॉक्टरांचे पहा. आपलं हृदय कोण चालवतो हे त्यांना विचारले तर म्हणतीन ऑटोनोमस नर्व्हस सिस्टिम. पण हा ऑटो कोण ? त्यांना उत्तर देतां येत नाही. आपल्या शरीरात ॲसिटिलीन व आल्ड्रीन ही दोन रसायने असतात. एक वृध्दि करते दुसरे आराम देते. पण शरीरात ती कोणत्याही नियमनासाठी काम करत नाहीत. ज्याच्यामुळे वृध्दि व्हायची ते आकुंचित होते, असं कां ? शरीरात काहीही परका पदार्थ आला तर तो आपोआप बाहेर फेकला जातो, पण गर्भाच्या बाबतीत असं होत नाही, उलट त्याची काळजी घेतली जाते, त्याचं पालनपोषण होते, वाढ होते आणि योग्य वेळ आली की तो बाहेर फेकला जातो. हे सगळं वेगळेपण कसं घडून येते ? कोण करते ?

महायुध्दें झाली पण निर्मिती कशाची झाली तर अणुबॉम्ब आणि हायड्रोजन बॉम्बची. शास्त्र हे अनैतिक आहे, त्याला नीतिमूल्यांचा आधार नाही. त्याच्यामुळे हेरगिरी, अत्याचारी, शास्त्रज्ञ सगळेच होऊ शकतात. ते गरुबाज असू शकतात किंवा चारित्र्यहीन; पाद्री असतात तसे, पण असू शकतात. त्यांचे कुठे चुकत आहे ? त्यांना फार मानाचं स्थान आहे, त्यांना खूप पारितोषिके मिळतात, पण नीतिमान म्हणावे तर अगदी खालच्या दर्जाचे, याला कारण त्यांना स्वतःबद्दल आदर नाही, त्यांनी स्वतःला ओळखलेले नसते म्हणून त्यांना हा आदरभाव नसतो, त्यांची महानता त्यांनी ओळखलेली नसते. आपण आपल्या खऱ्या स्वरुपाला जाणत नाही, हे शरीर, मन, बुध्दि, भावना म्हणजे काही आपण नव्हे, हा अहंकार, हा प्रति-अहंकार (धर्माबद्दल अगर दुसऱ्या विषयीही) हे आपण नव्हे, आपण सर्व जण शुध्द आत्मा आहोत.

आता तुम्ही आत्मा कसे बनता ते सांगते. हे तुमच्या भल्यासाठीच आहे म्हणून कोणी विरोध करेल असं मला वाटत नाही. ते तुमच्या कुटुंबाच्या किंवहुना साऱ्या जगाच्या कल्याणाचे आहे. आपल्यामधे ही कुण्डलीनी शक्ति आहे. भारतीयांना हे पुरातन ज्ञान आहे. कुराणात त्याचा उल्लेख 'असस' (Asas) असा आहे, बायबलमध्ये म्हटले आहे, "मी तुम्हाला अग्नीच्या ज्वालांच्या रुपांत दिसेन". वास्तविक, तुम्ही नुसता माझ्यावर अंधविश्वास न ठेवतां, स्वतः याचा अनुभव घ्या. अंधविश्वासामुळे अनेक प्रश्न निर्माण झालेले आपल्याला माहित आहे पण या कुण्डलिनी शक्तिचं जागरण झाल्यावर ती टाळूमधून बाहेर येते याचा तुम्ही साक्षात् अनुभव घ्या. परिणामी तुम्ही त्या सर्वव्यापी परमेश्वरी प्रेमशक्तिशी जोडले जाता. हे नुसतं भाषण किंवा उपदेश नाही. हे तुमच्या धर्माचे आविष्करण आहे. तुम्ही सूज्ञपणे विचार केला की आज जगात कुठेच शांतता नाही हे तर तुम्ही मान्य कराल. पहिल्या प्रथम काय होत असेल तर तुम्ही जागृत निर्विचार अवस्थेमधे येता. आपण जेव्हां जेव्हां विचार करत असतो त्या त्या वेळी एक भूतकाळाबद्दल नाही तर भविष्याबद्दल विचार करतो, वर्तमानकाळ कधीच डोक्यात नसतो. वर्तमानकाळ हेच सत्य आहे, भूतकाळ संपलेला असतो, भविष्यकाळाला अस्तित्व नसते. पण आपण वर्तमानात राहू शकत नाही हेही खरे आहे. एक विचार येतो, संपतो, पुन्हां दुसरा विचार येतो, तोही संपतो आणि असे आपण भूत व भविष्याच्या विचारांच्या लाटांवर उड्या मारत असतो. कुण्डलिनीचं जागरण झाल्यावर विचाराचा वेग मंदावून विचारांच्या मधे विलंब निर्माण होतो, हाच विलंब म्हणजे वर्तमान ज्यावेळी मनांत कसलीही प्रक्रिया नसते आणि अगदी तुम्ही शांत असता. तुमची जाणीव जागृत असते पण तुम्ही निर्विचार असता. अशा तऱ्हेने तुम्ही सर्वव्यापी शक्तिबरोबर, जिथे परम शांती आहे, जोडले गेल्याबरोबर ही शांती तुमच्या आंतमध्ये येऊन पसरु लागते. दुसऱ्यांना पण तुम्ही ही शांती देऊ शकता. परमेश्वर हाच शांतीचा

स्त्रोत आहे हे तुम्हाला समजते. अशा तऱ्हेने तुम्ही सगळीकडे ही शांति पसरू शकता. सहजयोगमधे हजारोंनी लोक शांत असलेले दिसतील. ते कोणत्याही देशाचे, कोणत्याही वंशाचे असतील पण एकत्र आले की एखाद्या सागरासारखे एकजीव होऊन जातात. हे काही काल्पनिक नव्हे, एखादा थेंब जसा सागरच बनून जातो तसे ते एकाच शक्तिचे अंश बनतात, एकमेकांना आनंद मिळतो, आपापसांत भांडत नाहीत. कारण ते सर्वच जण आत्मा झालेले असतात.

आणखी एक चांगली गोष्ट म्हणजे तुम्ही प्रकाशित होता. एरवी माणसं सत्तरी ओलांडली की भ्रमिष्ट होतात कारण त्यांचे चित्त भरकटत असते. त्यांना पटवणे अवघड होते. पण सहजयोगत तुमचे चित्त प्रकाशित होते. त्या प्रकाशात तुम्हाला सामुहिकता, एकत्रिसूत्रता मिळते. त्यामधे प्रेम आणि करुणा कार्यान्वित होतात. दुसऱ्याचे चांगले गुणच तुम्हाला दिसतात. मी माझा स्वतःचा एक अनुभव सांगते. मी प्रथम जेव्हां रशियाला गेले होते त्यावेळी मला रशियन भाषा मुळींच येत नव्हती. आणि माझ्या मदतीला कोण आले असेल तर २५ जर्मन सहजयोगी. माझ्या डोळ्यात अश्रू आले. मी म्हटले, तुम्ही इथे कसे ? ते म्हणाले, "जर्मन लोकांनी खूप रशियन ठार केले. इथे येणे आमचे कर्तव्यच आहे." असं प्रेम हे शुध्द असते, आत्मा झाल्याशिवाय ते शक्य नाही.

दुसरा फायदा असा होतो की प्रकाशित चित्तामुळे तुम्ही सदाचाराच्या मार्गावर येता. एका रात्रीत दारु, नशा, गुंगीची मादक औषधे इ. सेवन बंद झाल्याची उदाहरणे आहेत. पाश्चात्य संस्कृतीची अशी एक धारणा आहे की आयुष्याचा प्रत्येक क्षण उपभोग घेण्यासाठी आहे, पण असा उपभोग घेण्याची प्रवृत्ति विनाशकारी आहे. सहजयोगामधे विनाश न होता तुम्ही आनंद मिळवता. निसर्गाचं सौंदर्य तुम्ही पुरेपूर लुटता, साऱ्या मनुष्यप्राण्यांबरोबर आनंद मिळवता, तुम्ही वस्तूच्या अंतरंगातून, बाह्यातून नव्हे आनंद मिळवता. हे सर्व तुम्हाला तुमच्या चित्तातून मिळते. हे चित्तसुध्दा कार्य करु शकते. काल ते म्हणाले, "माताजी, आता फार थंडी पडणार आहे" सर्व सहजयोग्यांना चित्त निसर्गाकडे लावण्यास सांगितले म्हणजे निसर्ग त्यांना मदत करेल. काल स्वच्छ सूर्य होता. तुमच्या शक्तिमधून तुम्ही निसर्गालासुध्दा तुमच्या पायाशी लोळण घ्यायला लावाल, तुम्हाला परमेश्वरी शक्तीशी एकरूप व्हायचं आहे. ही परमेश्वरी शक्तीच सर्व ऋतु तयार करते, सर्व काही निर्माण करते. तिनेच तुम्हाला पण निर्माण केले आहे. आणि जे तुमच्या हिताचे आहे तेच ती करेल. तुम्ही दुसरा कोणी मरावा अशी इच्छा कराल तर ती असलं काम होऊ देणार नाही. पण एकदा आत्मसाक्षात्कार मिळाला, एकदा आत्म बनलात की तुम्हाला वाईट इच्छा होणारच नाही.

आणखी एक महत्वाची घटना तुमच्या बाबतीत घडते ती ही की जिथे तुम्ही लक्ष घालाल तिथे तुम्ही जागृति करु शकाल. जशी एक मेणबत्ती पेटवली की दुसऱ्या हजारो मेणबत्त्या ती पेटवू शकेल. मी आफ्रिकेमधे अजून गेले नाही, पण दक्षिण आफ्रिकेत, कॅमेरुनमधे खूप सहजयोगी आहेत. सैबेरियात मी अजून गेले नाही पण तिथेही खूप सहजयोगी आहेत. ह्याचा प्रसार होत आहे. त्याच्या विरोधात जे कोणी आहेत ते लवकरच नष्ट होणार आहेत, ते ढोंगी असल्याचे लोक ओळखतील, आपल्याला त्याची काळजी करावयाची जरुर नाही, ते उघडे पडणार आहेत. आपण कुणाचंही वाईट चिंतू नये, कुणाला अपशब्द बोलू नये. सहजयोगी कुणालाही ठार मारु शकत नाही, दुसऱ्यांना तुम्ही जागृति देत राहिल्यानंतर तुम्ही निर्विकल्प समाधीच्या स्थितीला येता, त्यावेळी तुमच्या मनातल्या सहजयोगाबद्दल सर्व शंका संपलेल्या असतात, स्वतःबद्दलच्या शंका संपतात. त्या स्थितीला

तुम्हाला पोचायचे आहे. बरेच जणांनी ती स्थिती मिळवली आहे.

मला रशियन लोकांबद्दल फार प्रेम व आदर आहे. कुण्डलिनी हा शब्दही कधीही न ऐकलेल्या लोकांनी सहजयोग कसा पत्करला पहा. ते स्वतःबद्दलच्या कसल्या शोधात होते ? त्या सूक्ष्म विषयाबद्दल त्यांना किती प्रेम आहे, किती जण आहे ती जगातल्या फारच थोड्या लोकांमध्ये दिसून येते.

ही आणीबाणीची वेळ आहे आणि जे कोणी दूर राहतील ते याला कायमचे मुकतील. ख्रिस्त म्हणाले होते, "तुम्ही मला ख्रिस्त, ख्रिस्त म्हणून हाका माराल. पण मी तुम्हाला ओळखणार नाही". तेव्हां तुम्ही आत्मा होणारच आहांत हे ओळखा. ख्रिस्तांनी सांगितल्याप्रमाणे तुम्ही दुसऱ्यांदा जन्म घेणार आहांत. तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा अगर ठेवू नका पण प्रथम तुम्ही स्वतःबद्दल आत्मविश्वास धरायला शिका. पण जसजशी तुमच्यातील अध्यात्मिक प्रवृत्ति वाढेल तसतसे तुम्ही ओळखाल की मी कोण आहे हे मी तुम्हाला सांगणार नाही. ख्रिस्त हे परमेश्वराचे पुत्र होते, तुम्ही हे मानलं नाही तरी ते तसे होते. मी जी कोणी आहे ते आहे पण मी तुम्हाला ते सांगण्यासाठी आले नाही. तुम्ही आत्म्याला आधी जाणलं पाहिजे. मगच तुम्हाला सर्व काही समजणार आहे. कां तर ते तुम्हाला इतरांनापण त्यांच्या भल्यासाठी द्यायचे आहे. किती सुंदर जबाबदारी !

शेवटची गोष्ट म्हणजे तुम्ही परमेश्वराच्या साम्राज्यात येता आणि आनंदाच्या सागरांत बुडून जाता. त्या आनंदाच्या स्थितीमधे सुख व दुःख असे द्वैत नसते. ते एकच एक असते. तुमची सर्व लालसा, हाव संपून जाईल, तुम्ही शुध्द व्हाल आणि स्वतःला पाहू शकाल. तुम्ही संन्यास वगैरे घ्यायची जरुर नाही, तुम्हाला हिमालयात जायची जरूर नाही. उपास-तपास करायची ज़रूर नाही. कारण सर्व काही आंतूनच होणार आहे, बाहेरून काही बदलायची जरूर नाही. साऱ्या जगामधे हे परिवर्तन होणार आहे हे मला माहित आहे. जीनसूचा मुलभूत आधार बदलणार आहे. तऱ्हेतऱ्हेचे लोक सहजयोगात आले आणि त्यांचे परिवर्तन झाले. खुप लोक दुर्धर अशा आजारातून मुक्त झाले. काहीही पैसा खर्च न करतां; केवळ त्यांच्यातच अंतर्भूत असलेल्या शक्तिमुळे. म्हणून सहजयोग हा नैसर्गिक आणि क्षणांत घटित होणारा योग आहे. जनावरांना पण ही चैतन्य-लहरींची शक्ति दिली तर त्यांच्यावर ती कार्य करते, शेतीमध्येही याचा वापर केला तर पैदास दस पटींनी वाढते.

या शेवटच्या निर्णयाच्या वेळी मानवांची एक नवीन जात जन्माला येणार आहे. ती तुमची स्वतःची शक्ति आहे. तुम्ही किती महान आहांत. किती तेजस्वी आहांत हे तुम्हीच स्वतःला जाणून घ्यायचे आहे. पूर्णपणे विनामूल्य. कारण तुम्हाला विशेष बुध्दि प्राप्त होते. आत्म्याच्या प्रकाशामध्ये तुम्हाला आपल्या हिताचे काय आहे ते समजते. धर्माच्या वृध्दिसाठी जे लोक अधिकारी म्हणून कार्य करत आहेत त्यांना माझी एकच विनंती आहे. त्यांनी माणसांना आता एका टप्प्यापर्यंत आणून पोचवले आहे. पायऱ्या जशा चढत रहाव्या तसे, हे कशासाठी ? धर्म कशासाठी हवा ? त्याचा उद्देश मानवाची अध्यात्मिक उन्नति हाच असला पाहिजे. धर्मामुळे सर्वत्र संतुलन प्रस्थापित व्हायला पाहिजे. जसं विमान आकाशांत नीट उडावं म्हणून त्याचा समतोलपणा ठेवला. विमान उडण्यासाठी पूर्ण सक्षम बनलं नाही, उडू शकले नाही तर त्याचा काय फायदा ? तुम्ही आत्म्याच्या या स्वातंत्र्यामधे आकाशात भरारी मारली पाहिजे. हे करू नकां, ते करू नकां, असं काही सांगायची जरूर नाही. तुम्ही उड्डाणासाठी सिध्द झाला आहांत. आतां आत्मसाक्षात्काराचा आनंद उपभोगा.

परमेश्वराचे तुम्हां सर्वांना अनंत आशिर्वाद.

# परम पूज्य श्री माताजी यांचे

# सहज योग्यांचे साठी भाषण

## लंडन जून १९९५

निसर्गाच्या सहवासात आपण एकदम निर्विचारतेमध्ये जातो. वृक्षांच्यामध्ये हा सर्व हिरवेपणा भरलेला असतो. ते किती सामूहिक आहेत, त्यांच्या पासून आपल्याला पुष्कळच शिकण्यासारखे आहे. प्रत्येक पानाला उन्ह मिळेल अशी व्यवस्था असते, ते कसे वाढतात, कसे सर्व संयोजित असतात, ते अशा प्रकारे कसे वागतात; याचा कोणाच्याच मनात विचार येत नाही. त्यांना आत्मसाक्षात्कार सुद्धा मिळाला नाही. पण त्यांच्यात असे काय आहे, जे हे सर्व घडविते? इतक्या सुंदररित्या ते कसे सर्व कार्यान्वित करतात? ते परमेश्वराच्या पूर्ण नियंत्रणात असल्याने त्यांना कसलीच काळजी करावी लागत नाही. पशु सुद्धा परमेश्वराच्या नियंत्रणात असतात म्हणून त्यांना पशु म्हणतात पाश म्हणजे नियंत्रण. श्री शिवांचे नाव पशुपति आहे ते सर्वांना प्रेमाने व अतिशय नाजूक प्रकारे सांभाळतात. या सर्वांची मानवासाठी निर्मिति केली आहे. पण मानवाला हे समजत नाही की त्याच्या उपयोगासाठी हे सर्व जग निर्माण केले गेले आहे. हे उपयोग करण्यासाठी आहे, दुरुपयोगासाठी नाही. वातावरणात एक गोष्ट आपल्या लक्षात घ्यायला हवी, की ते कसे सामुहिक आहेत. त्यांच्या मध्ये कोणतेच प्रश्न नाहीत. ते एकत्र राहतात. विश्व चक्राला ते धरून रहात असल्याने वातावरण चांगले आहे. जीवनरस चढतो आणि वृक्षाच्या प्रत्येक भागास आवश्यक असेल ते देतो शेष भाग परत वातावरणात मिसळतो. तेव्हा तो एकाच ठिकाणी चिकटून रहात नाही.

मी तुम्हाला फार पूर्वीच सांगितले आहे की तुम्ही कशालाही चिकटू नका. तुम्ही निरागस झाल्यास सर्व चांगले कार्यान्वित होते पण आसक्त झाल्यास तुम्हाला काळज्या व अडचणी मिळतात. त्याच्या विषयी जास्त विचार केल्याने जीवनात फार त्रास होतो. अनासक्त झाले की निसर्ग आपल्या हातात सर्व घेतो मग तुम्हालाही आराम मिळतो. पण, तुम्ही विचार करु वागला, की हे करायचे आहे, ते करायचे आहे, ते मिळवायचे आहे की तुम्ही काळजी करू लागता मग दोन गोष्टी घडू शकतात. एक म्हणजे तुम्ही गोंधळात पडतात मग तुम्हाला काहीच प्राप्त होत नाही व तुम्ही विचारच करीत रहाता दुसरे म्हणजे पूर्ण थकून जाता. पण सहजयोगी असल्याने तुम्ही अनासक्त झाला की सर्व कसे आश्चर्यकारक रित्या कार्यान्वित होते.

आत्मसाक्षात्कार मिळाल्यावर तुम्ही सर्व आसक्ती सोडण्याचा प्रयत्न करायला हवा. तुम्ही जाणीवेच्या निर्विचार अवस्थेमध्ये रहायला हवे. निर्विचारातेमध्ये राहिल्याने तुम्ही निरासक्त होता. आता तुम्ही आसक्त आहात का, ते पहा निरासक्त होण्याची साधना करता येते. तुम्ही स्वतःस आरशात पहा आणि लक्षात घ्या की स्वतःचे प्रतिबिंब जे तुम्ही पहात आहात, ते तुम्ही नव्हेत तर त्या प्रतिबिंबाहून पुष्कळ अधिक आहात.

आपल्याला आत्मसाक्षात्कार मिळण्यापूर्वी आपली काळजी घेणारे काय असते, आपल्या पॅरासिंपथेटिकचा कोण सांभाळ करते? आपल्या लहानसहान गोष्टीच्याकडे लक्ष देते, आपल्याला सन्मार्गावर ठेवण्याचा प्रयत्न करते, आपल्याला चेतना देते, ते काय असते? आपल्यामध्ये हे सर्व करणारे काय आहे? आपल्यातील आत्मा अद्याप चित्तामध्ये आला नसतो पण आपल्या अंतरयामी असलेले काही तरी आपल्याला सत्याचा विचार करावयास भाग पाडते, सत्याचा शोध घ्यावयास लावते आपल्याला जाणीव करून देते की समाजात काही तरी चुकते आहे, कुंडलिनी निद्रिस्त असते आणि आत्मा हृदस्थ असतो. त्यांच्या मध्ये काय असते? तो असतो जीव.

काही वेळेस लोकांना मृत्यू आला असतो किंवा मृत्यू येणार असतो आणि ते परत जीवित होतात तेव्हा ते सांगतात की ते एक प्रकारच्या बोगद्यामधून गेले हाते. काहींचा काळा बोगदा असतो, काहींचा प्रकाशमय असतो तर काहींचा हलका असतो. तो आपल्यातील जीव असतो, तो ऊर्ध्वगामी होतो व त्याचे बरोबर आपले चित्तही ऊर्ध्वगामी होते आणि आपल्याला वाटते की आपण बोगद्या मधून जात आहोत. आत्मसाक्षात्कारानंतर आपल्याला हे जीव दिसतात त्याचे पूर्वी नाही. हा जीव तुम्हाला मार्गदर्शन करतो, त्याने तुम्हाला सहज योगात आणले आहे आणि सांगितले आहे की तुम्ही सत्याचा शोध घ्या, आणि सत्य मिळवा तोच सातत्याने प्रयत्न करतो. जीव हाच तुमच्या मागे असतो आणि त्याच्यामुळे शोध घेण्यात लोक फार उत्सुक असतात. आत्मसाक्षात्काराचे पूर्वी हे सर्व जीवा कडून येते. हा जीवच तुम्हाला शोधण्यास प्रवृत्त करतो. व्यक्तिच्या मृत्यूनंतर जीव बाहेर येतो आणि आत्माही येतो म्हणून आपण त्याला मृत जीव म्हणतो. काही काळ ते हवेत तरंगतात ते साक्षात्कारी जीव असल्यास ते परमेश्वराशी एक होतात. इच्छा असेल तेव्हा ते जन्म घेऊ शकतात. परंतु मृत जीवनांवा आसक्ती असते, त्याच्या मुलांची, घराची किंवा दारू-पिणे वा तशाच निरर्थक गोष्टींची हेच जीव आपल्याला त्रास देतात. ते ग्रुपमध्ये असू शकतात. त्याचे विविध प्रकार असू शकतात. ते सुप्तचेतना (सब कॉन्शस) किंवा चेतना बाह्यता (सुप्ता कॉन्शस) यांच्या कार्याचे बाबतीत वाईट असू शकतात. पण याचे बाबतीत आपण दुसऱ्या लोकांच्या बरोबर बोलू शकत नाही कारण त्यांना काहीच माहिती नसते व असे काही असते याच्यावर त्यांना विश्वास ठेवायचा नसतो. मृतजीव, मृतात्मे असतात हे धर्मात सांगितले आहे व त्या लोकांच्या धर्मावर विश्वास असले पण ते केवळ चर्च, मशीद वा मंदीरे यांच्यातच असते. वैयक्तिक जीवनात, ते विश्वास ठेवत नाहीत की या सर्व गोष्टी त्यांच्या समोवताली आहेत.

आपल्याला असाध्य वाटणाऱ्या अडचणी मृत जीवांच्यामुळे निर्माण होऊ शकतात. तेव्हा त्यांच्या संबंधात निरासक्त वृत्ती ठेवणे हाच सर्वात उत्तम मार्ग होय. आता एखादी व्यक्ति घराशी अथवा दुसऱ्या एखाद्या गोष्टशी असक्त असेल तेव्हा आपल्या इच्छा ज्याच्या मधून पूर्ण करून घेता येतील अशा व्यक्तिच्या मनात प्रवेश करतात मग सर्वच बिघडते. तुमचे काहीच चांगले होत नाही. काहीच मिळविता येत नाही. विशेषतः अ गुरुंचे सहवासात तुम्हाला हे सर्व त्रास होतात. निंरासकतेमधून हे सर्व सुधारावे लागते. काही लोकांना त्यांच्या मुलांची आसाक्ति असते. मग मृतात्मे या मुलांना चिकटतात. तुम्हाला पैशाचा फार लोभ असेल तर काही तरी होऊन तुमचा पैसा जातो मला पुष्कळ लक्षाधीश लोक माहिती होते पण त्यांना हव्यास होता. मग मृतात्म्याने अथवा तसेच काही तरी त्यांच्यात प्रवेश करून त्यांना सूचना देत राहिले की इकडे पैसे गुंतव, तिकडे गुंतव वगैरे मग पैसा शिल्लक राहिला नाही, विशेषतः पाश्चात्य व्यवसाय असा असतो तुम्हाला सूचना मिळत रहातात, इकडे पैसा गुंतवा, तिकडे गुंतवा मग तुमच्या जवळ फक्त कर्ज बाजारीपणा रहातो. बाकी काही रहात नाही.

पैशाचे बाबतीत अगदी निर्लोभी असावे. मी टेराकोटाच्या व्यवसायात कसा प्रवेश केला ती गोष्ट सांगते सेवानिवृत्त झालेले काही लोक होते. त्यांना वाटले, निर्यात करून देशसेवा करावी. परंतु त्यांचे एक दुसऱ्यांशी पटले नाही. प्रत्येकाला वाटले तेच सर्वोत्तम आहेत; मग त्यांची भांडणे होऊन त्यात सर्व क्रप फुटून गेले. त्यांच्या पैकी एकाला मी विचारले, "मात्र आता तुम्ही काय निर्यात करता?" तो म्हणाला, पंखे" मी म्हणाले" पंखे? स्वित्झर्लंडला?" त्यांनी विचारले "तुम्ही काय बाहेर पाठविला?" मी म्हणाले "टेरा कोटा" त्यांना आश्चर्य वाटले "टेरा कोटा? " मला बँकेचे व्यवहार माहिती नाही. की बिझीनेसचे कांहीं ज्ञान नाही. याचे संबंधात मी इतकी अनासक्त आहे. सगळीकडे टेराकोटाचे अगदी उत्तम चालू आहे. कारण लोकांना हाताने बनविलेल्या वस्तू हव्या आहेत. त्यांना फारच त्या आवडतात. शिवाय ज्यांना केवळ एकच कपडा घालण्यास आहे अशा खेड्यातील लोकांना मी मदत करते. माझ्या धर्मादाय स्वभावातही ते मानवते. शिवाय लोकांनी हातांनी बनविलेल्या वस्तू वापराव्यात ही एक पातळीवर गरज आहे आणि ते चांगले कार्यान्वित झाले आहे तुम्हाला आश्चर्य वाटेल, मला व्यवसाय समजत नाही पण मला त्याचेवर विचार करावा लागत नाही ते आपोआप होते. तेव्हा मला त्याचे बद्दल अनासक्ति आहे. मी माझ्या स्वतःवर डोकेदुःखी ओढून घेतली नाही. हे गरीब लोक सगळीकडे काहीतरी सुंदर बनवित आहेत, हे पहातांना किती आनंद वाटतो! सर्वत्र किती तरी सुंदर वस्तू आहेत.

तेव्हा, तुम्ही जाणीवेच्या निर्विचारतेमधून अनासक्ति विकसित केली तर परमेश्वर त्याचा विचार करेल. तुमची सर्व काळजी घेतील. परमेश्वर सर्व शक्तिमान आहे अशी तुमची श्रद्धा हवी. तो सर्व काही करतो, प्रत्येक गोष्टीची काळजी घेतो. तुम्ही कशाला काळजी करता हा चांगला जीवन क्रम आहे, तुम्हाला काही करण्याची गरज नाही. तुम्ही काळातीत आहात. तुम्ही तिन्ही गुणांच्या पलिकडे गेले आहात. तुम्ही विचारांच्याही पलिकडे गेले आहात. तुमचे विचार, तुमचे मन, तुमच्या पद्धती, यांच्यातून तुम्ही जे काही करत होता, ते थांबवा अमेरिकेत एका दुकानदार मुलीला मी जागृति दिली. तिने मला सांगितले "श्रीमाताजी, माझ्या दुकानातील प्रत्येक गोष्ट मला माहिती होती. माझ्याकडे काय आहे त्याची तपशीलवार माहिती मला होती. आता मी काळजी करीत नाही. माझ्या दुकानात काय आहे ते मला माहिती नाही. मी म्हणाले "त्याचे कारण काय?" ती म्हणाली "मला पुष्कळ नफा होतो." मी म्हणाले ते फारच चांगले. डोक्यावर सर्व बोजा घ्यायचा आणि नफा मात्र काही नाही याचा काय उपयोग? परमेश्वरी इच्छेस पूर्ण व सतत समर्पित होण्याची तयारी असावी ते जे काही करतात ते ते तुमच्या चांगल्यासाठीच असते.

तुम्ही सहजयोगी आहात, तुम्ही प्रश्न ओढून घ्यायला हवे. तुम्ही शांतवन करू शकता व स्वतः शांत राहू शकता. तुमच्च्या जवळ सर्व शक्त्या आहेत. स्त्रियांना त्यांच्या शक्तिंचे ज्ञान असावे. त्यांच्या जवळ काय काय शक्य आहेत ते त्यांना समजत नाही म्हणून त्यांना सर्व अडचणी आहेत. शिवाय काही पुरुषांना ग्रुप बनविण्याची संवय आहे. तिसरा प्रकार आहे, लीडर्सची पत्नि. काही ना काही तरी कारणाने त्या अत्यंत डॉमिनेटिंग पद्धतीने वागू लागतात. त्यांच्याजवळ एक प्रकारे पंपिग स्टेशनच असते त्यांच्या अहंकारात हवा भरली जाऊन ते हवेत तरंगताल व प्रत्येकाला बाहेर काढू लागतात. अशी गोष्ट सुद्धा पाप आहे. तुम्ही लीडरची पत्नि आहात म्हणून तुमचे वर्तन चांगले असावे. तुम्ही लोकांच्या भावना दुखवू शकत नाहीं.

शास्त्राच्या प्रमाणे पाच प्रकारच्या माता असतात. त्याच्यापैकी एक असते लीडरची पत्नि, गुरुची पत्नि, ती आई असते आणि तिने आईसारखे वागावे. आई वागवते त्याप्रमाणे तिने सर्व शिष्यांना वागणूक द्यावी. समजा एखाद्या गोष्टीवर तिचा लीडर पति अस्वस्थ असेल तर तिने त्याला शांत करावे. तिने म्हणावे "असे पहा, तुम्ही असे

करू नका" हे तिचे काम आहे, दुसऱ्यांवर हुकुमत गाजविणे नव्हे. जे करू नये तेच त्या करतात. कोणाला काही अडचण असल्यास व त्याला लीडरला भेटणे शक्य नसल्यास तो लीडरच्या पत्निला भेटेल व तिला आपली अडचण सांगेल. काही वेळेस पति म्हणून तुम्हाला तुमच्यात सुधारणा करावी लागते आणि पत्नी म्हणून तुम्ही समाजाचे एक घटक असता व तुम्हाला घडवावे लागते व संभाळ करावा लागतो ते स्त्रीयांचे कर्तव्य आहे. त्यांना स्वतःचे कर्तव्य काय आहे तेच समजत नाही. सेक्रेटरी प्रमाणे अथवा राजकारण्याप्रमाणे काम करणे हे तुमचे कर्तव्य नाही.

विवाह कसा व्यवस्थित ठेवायचा व कसा त्यास न्याय द्यायचा हे तुम्हास माहिती हवे. पण लग्न म्हणजे देखावा नाही हे त्यांच्या लक्षातच येत नाही. असे काही करण्याचे ऐवजी त्यांनी लग्न करू नये हे चांगले अर्थात सहजयोगात तुम्हाला घटस्फोट घेण्यास परवानगी आहे. हा स्वातंत्र्याचा प्रश्न आहे. पण तुम्हाला सहजयोगास मदत करायची असल्यास तुमचा विवाह यशस्वी करणे अधिक चांगले.

दुसरी एक फार धोकादायक गोष्ट म्हणजे काही लोकांना, लीडरच्या विरोधात ग्रुप बनविण्याची सवय असते. अमेरिकेत अलिकडेच एक फार अवघड केस होती. ज्या ठिकाणी ती गेली त्या ठिकाणी तिने लीडरच्या विरोधात ग्रुप बनविला इतका तो मोठा प्रश्न निर्माण झाला. मी तिला भारतात जाण्यास सांगितले. ती आत्महत्या करण्यास गेली. तिने नदीत उडी टाकण्याचा प्रयत्न केला पण उडी टाकली नाही ती म्हणाली मी आत्महत्या करते; तिने पॅराडॉल किंवा असे काही तरी औषध घेतले पण तिला काही मृत्यू आला नाही. तेव्हा असा आक्रस्ताळेपणा करून तुम्ही स्वतःच्याच विरोधात जाता. मी तिला सांगितले की तु भारतात जा. ती सारखीच म्हणत होती की मी नाही जाणार, मी हे करीन, ते करीन. दुसऱ्या दिवशी तिच्या वडिलांना मोठा हार्ट अ‍ॅटॅक आला मग तिला परत जावे लागले. तेव्हा असा आक्रस्ताळेपणा स्त्रीला वाईटच.

आमच्या जीवनातील एक घटना मला आठवते. माझ्या पतिंच्या कंपनीमधे नोकरी करणारा एक माणूस नोकरी सोडून दुसऱ्या कंपनीमधे गेला कारण सरकारी कंपनीत त्याला चांगला पगार मिळत नव्हता. पण नवीन कंपनीतील नोकरी त्याला आवडली नाही व त्याही गोष्टी ते ज्या प्रकारे करीत होते ते आवडले नाही म्हणून त्याने माझ्या पतिंना विचारले की, त्याला पुन्हा नोकरी मिळेल का? माझे पति म्हणाले "मी काही करू शकत नाही, तू नोकरी का सोडली? तुझा माझा काही संबंध नाही." आता काय करायचे हे त्यास कळेना, त्याने प्रयत्न केले पण काहीच कार्यान्वित होत नव्हते. म्हणून मला भेटून त्याने सांगितले की त्याला परत यावयाचे होते. मी चांगला अधिकारी आहे, मी फार चांगले काम केले आहे मी दुसरी नोकरी धरली हा माझा मूर्खपणा झाला. परत येऊन मला देशाची सेवा कराची आहे. म्हणून सर सी. पी. घरी आल्यावर मी त्यांना सांगितले की हे गृहस्थ मला भेटले ते म्हणाले "होय ते योग्य व्यक्तिला भेटले. आता तुम्ही माझे डोके खाऊ नका कारण मी त्याला "नाही" असे सांगितले आहे" मी म्हणाले " मी फक्त मी तुम्हाला सांगते कारण त्याला वाटले मी तुमच्या पेक्षा फार अधिक उदार आहे." सर सी. पी. म्हणाले "मी कमी उदार नाही." मी म्हणाले "ठीक आहे, तुम्हाला हवे असेल ते करा." त्यांना मान्य झाले. म्हणून स्त्रीचे कार्य फार महान, फार उच्च व फार गहन आहे. पतिंच्या बरोबर शंभर लोक काम करीत होते त्यांनी मला सांगितले की तुम्ही या लोकांना सांभाळा. मी शंभरच नव्हे तर या शंभराच्या शेकडो नातेवाईकांनाही मला शक्य होती ती मदत केली. हे फारच समाधानकारक असते तुम्ही स्वतःचा एक समाज निर्माण करता तुम्हाला गरज भासल्यास ते उपस्थित असतील, ते तुम्हाला मदत करतील व तुमची सर्व काळजी घेतील.

दुसऱ्या लोकांवर प्रेम करणे व त्यांना आनंदी

करण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे असते. स्त्रीयांना ते जमले तर त्यांनी स्त्रीत्व मिळविले उलट इतर लोकांच्या विरोधात नवऱ्याला कथा सांगणे ही पद्धत नव्हे. तुम्हाला कोणी त्रास देत नाही तोपर्यंत दुसऱ्या व्यक्तिच्या विरोधात काही बोलू नये. चांगलेच सांगावे हा उत्तम मार्ग आहे उदा. माझ्याकडे कोणी तरी सांगावयास येते की "श्री माताजी" या माणसाने मला हे केले, त्या माणसाने ते केले, तर मी म्हणाले "तुम्ही हे कसे सांगता तेच मला समजत नाही; कारण ती व्यक्ती माझ्यासमोर तुमची तास भर स्तुति करत होती". लोकांचा माझ्यावर विश्वास आहे. अशा प्रकारे तुम्ही कुटुंब सांभाळू शकता प्रत्येकास सांभाळू शकता. स्त्रीयांनी सर्वात प्रथम हे लक्षात घ्यायला हवे की त्यांनी प्रेमळ व दयाळू असावे. त्यांची शक्ति त्यांच्या करुणेत आहे. माझी सुद्धा तीच शक्ति आहे.

काही लोकांना माझे बोलणे ऐकू येत नाही. पण तुम्हाला त्याचे काही वाटत नाही ते प्रेम आहे, तुमच्या व माझ्यामधील प्रेमाच्या वातावरणाचा अनुभव घेणे किती महान आहे; त्याच्या पेक्षा काय अधिक मोठे असणार? इग्लंड विश्वांचे हृदय आहे. हृदयाला कशाचे प्रेम असेल? प्रेम व करूणा करूणेतूनच आपण एक होतो, हे तुम्ही समजून घ्या. जगातील अनेक श्रीमंत, प्रसिद्ध व मोठे लेखक माझ्या परिचयाचे आहेत. सर्व प्रकारचे लोक त्यात आहेत पण त्यांची नेहमी तक्रार असते, वृद्ध झाल्यावर आम्हाला कोणी भेटण्यास येत नाही. मी म्हणते येथे उलट आहे. जेवढी मी अधिक वृद्ध होतो तेवढे जास्त लोक मला भेटावयास येतात. माझे वय कोणालाच समजत नाही. ते म्हणतात "तुम्ही हे कसे करता?" मी सांगते "करूणा व शुद्ध प्रेम" त्या लोकांनी कधी दुसऱ्यांवर प्रेम केलेच नाही. ते कायम असेच राहिले म्हणून ते आता एकाकी आहेत ते आपल्या फ्रिजशी बोलतात कल्पना करा. त्यांच्या फ्रिज बरोबर बोलतात! असे ते आपले मित्र खरेदी करतात.

आपण किती सामूहिक आहोत, किती एक दुसऱ्यांना मदत करतो, किती एक दुसऱ्यांवर प्रेम करतो, ते पहा, अशा प्रकारे अंतर्मुख होणे महत्त्वाचे आहे. तुमची चैतन्य लहरी वाईट असल्या तरी काही बिघडले नाही त्या सुधारतील, पण तुमची प्रवृत्ती चांगली हवी. ज्यांची चांगली प्रवृत्ती नाही अशांची सहज योगात प्रगति होणार नाही. प्रेम शुद्ध असावे. ज्याच्यावर तुमचे प्रेम असते, त्याचे दोष तुम्हाला दिसत नाही. काही वेळेस कोणा व्यक्तीस काही सांगावयाचे सल्यास मला त्याची तयारी करावी लागते. मी या त्या प्रकारे सांगेन आणि मी त्याच्याशी बोलत असतानाच त्याच्यी आर्धी वाईट व्हायब्रेशन्स गेलेली असतात तुम्ही आचरणात आणले तर फारच सोपे आहे. लहान लहान गोष्टी सुद्धा तुम्ही त्यांना सुचवू शकाल.

इग्लंड मध्ये व्हिक्टोरिया राणीचा एक पुतळा होता. कोणी तरी त्याचे नाक तोडले. झाले ! प्रत्येक जण हातात फलक घेऊन निषेध करण्यास गेला आणि विचारले "कोणी नाक तोडले? तुमची हिम्मत तरी कशी झाली"? आणि त्यांनी ते परत बसविले ती अशी व्यक्ति होती की तिच्या देशात तिला फार मान्यता होती, असे म्हणता येईल की देश तिच्या वर्चस्वा खाली होता. स्त्रीचे व्यक्तिमत्त्व असे असते हे आपण लक्षात घ्यायला हवे. युद्ध असेल तर स्त्री जॉन ऑफ अर्क होते व शांतिचा काळ असल्यास ती युद्ध टाळून शांतता विघडू नये या साठी तयार असते. ती शांतता निर्माण करते. ती इतकी शक्तिशाली आहे. ती खरी शक्ति आहे. पुरुषांच्या बरोबर स्पर्धा करणे नव्हे हे इतके महान कार्य आहे, इतके गहन आहे व कारूण्य निर्माण करणारे आहे. शांततेच्या क्षेत्रात स्त्रिया करूणा कार्यान्वित करण्याच्या क्षेत्रात स्त्रीया काय करू शकतात, हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे आणि तुम्ही सहजयोगी असल्याने हे शक्य आहे.

नवऱ्यांनी त्यांच्या वायकांचा सन्मान करावयास हवा. ते महत्त्वाचे आहे. जेथे स्त्रीयांचा आदर केला जात नाही, तेथे संकटे येतात. उदा. बंगलादेश स्त्रीयांचा आदर करत

नसल्याने तो देश संकटांनी भरला आहे. पाकिस्तान संकटमय आहे कारण तेथे स्त्रीयांना मान नाही. सौदी अरेबिया, इराण यांचे काय? या देशातही त्रास आहेतच कारण स्त्रीयांना आदर नाही. परंतु स्त्रियांनी स्वतःसही आदर द्यायला हवा. पश्चिमेकडील स्त्रीयांच्या प्रमाणे नाही. तिकडे स्त्रिया स्वतः पुरुषांच्या समोर येतात. पुरुषांना सतत आकर्षित कशासाठी करावयाचे? ते तुमच्या मागे सतत धावतील असा पोषाख का करायचा? अशी संस्कृती स्त्रीयांना खरोखर हीन करते आपण वेश्या नव्हे. आपल्याला आत्मसन्मान हवा. मी तुम्हाला एका राणीची जीवन कथा सांगितली होती. मुस्लीम आक्रमकांचा युद्धात विजय होत असल्याने आपल्या पावित्र्याचे रक्षण करण्यासाठी त्यांनी स्वतःचे दहन केले. करूणा ही स्त्रियांची शक्ति आहे पण पावित्र्य हे त्या शक्तिचे वाहन आहे. आपल्या शरीरराचा पतिचा, मुलांचा, प्रत्येकाचा सन्मान करावयास हवा. ते महत्त्वाचे आहे. पण तुमच्या कुटुंबाचा व समाजाचाही सन्मान करावयास हवा. तुम्ही स्वतःचाही सन्मान केला पाहिजे. स्त्री आणि पुरुष परस्परास पूरक आहेत. पश्चिमेने विज्ञानाने प्रगति केली आहे व कृष्ण वर्णीय यांना पूरक आहेत. कृष्ण वर्णी नसतील तर त्यांना बक्षिसे कशी मिळतील. संगीताचा काय उपयोग? तेव्हा सर्व गोष्टी परस्परांना पूरक आहेत. आपण सर्व एक आहोत आपल्याला भारतीय हवे आहेत व इंग्रजही हवे आहेत. आपण पूरक आहोत. आपल्याला उजव्या हाता करिता डावा हात सुद्धा पाहिजे अन्यथा ते पूरक कसे होतील? म्हणून पत्निंचा सन्मान करावा आणि पत्निने पतिचाही सन्मान करावा कारण ते पूरक आहेत.

शिवाय पति आणि पत्नी यांच्या संबंधी सुद्धा काळजी असते. गणपतिपुळे येथे लोक जातात. त्यांना लग्न करण्याची लहर येते, गणपति पुळ्यातून बाहेर पडले की त्यांना लग्न करायचे नसते, मी अनेक प्रकारचा वेडेपणा पाहिला होता, पण हा वेडेपणा मला माहिती नव्हता, लग्ने ठरविण्यास मी इतका वेळ घालविते तो वेळ मला वाचविता आला असता तर मी क्षणिक एक पुस्तक लिहू शकले असते. लीडर्सना एक एक केसची काळजी असते की या स्त्रीला त्या पुरुषाबरोबर राहायचे नाही आणि या माणसाला त्या स्त्रीच्या बरोबर राहायचे नाही हा प्रश्न तसाच राहिल आणि पुढील वेळेस ते दुसरे लग्न करण्यास येतात. ज्यांना लग्न करायचे नसेल त्यांनी करू नये परंतु लग्न केल्यावर ते असे वागतील तर त्यांना सहजयोगात येऊ दिले जाणार नाही. कारण ते घटस्फोट घेतात व सहजयोगाला दोष देतात.

आपण या वृक्षांच्या खाली बसलो आहोत आणि ते जीवित असल्याने आपण वचन घ्यायचे आहे की आम्ही परस्परामध्ये अडचणी निर्माण करणार नाही पति आणि पत्नि म्हणून आम्ही आनंदात राहू अर्थात एखादी अवघड केस असेल तर ती सोडविता येईल. विवाह ही एक संस्था आहे. तुम्हाला एका मागून एक घटस्फोट देता येणार नाहीत जे महान जीव तुमच्या पोटी जन्म घेऊ इच्छितात. ते यावेत म्हणून विवाह आहे. परंतु तुम्ही असे वागल्यास ते होणार नाही. तुम्हाला घटस्फोट घ्यायचा असेल तर निदान पुन्हा लग्न करू नका. तुम्ही लक्षात घ्यायला हवे की पुढील दहा-पंधरा वर्षामध्ये ही मुले फार मोठी शक्ति होणार आहेत ती तुम्हाला सुधारतील, तुमच्यामधील गुंतागुत ते काढून टाकतील, त्यांना सहजयोगी म्हणून मोठे होऊ द्या आणि मग किती फरक पडतो ते तुम्हाला दिसेल ती किती शहाणी आहेत, सुंदर आहेत. त्यांना संभाळा, मदत करा आणि समजून घ्या. आपल्याला एक पाऊल पुढे टाकता येईल. येथपर्यंत आपण आलो आहोत. सर्व निरर्थक क्षुद्र आणि निरुपयोगी गोष्टी आणि प्रश्न विसरून जा. सहजयोगा करिता आपण काय करणार आहोत? आपल्याकडे शक्ति आहे. एक उंच उडी घ्या आणि सर्व कार्यान्वित होईल. प्रत्येकानी या सगळ्यांचा विचार करणे आवश्यक आहे आणि मला खात्री आहे की सर्व काही व्यवस्थित कार्यान्वित होईल.

परमेश्वराचे तुम्हाला आशिर्वाद.